# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७१**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तिसरे / अंक ८ / जुलै २००३

## संपादकीय

## आपुल्या घरात हाल सोसते मराठी

मराठी भाषा आणि मराठी माणूस हा मराठी माणसाच्या चिंतनाचा आणि चिंतेचा फार जुना विषय. छापावं, दाखवावं असं काही नसलं की माध्यमानाही तोंडी लावण्यासाठी हे विषय हवे असतात. व्याकरणाची शक्य असेल तेवढी उपेक्षा, टाळाटाळ करीत मराठी शाळांतून मराठी भाषा शिकविली जाते. परिणामत: 'बोली भाषेत बोलतो', असं स्पष्टीकरण देत वाटेल तसं मराठी बोललं, वापरलं जातं. 'मी आईला बोलली की मला शिडी (सीडी) भेटलीच नाय' असं मराठी कानावर आलं की ठचकायलाच होतं. दिपक, सुनिल, प्रदिप, मंजिरी अशी आपली स्वत:ची नावं लिहिणारे विद्यार्थी भेटले व त्यांना 'तू तुझं नाव शुद्ध मराठीत लिहित जा.' असे सुचवलं तर त्याचं सांगणं असतं, 'सर, पण शाळेपासून मी असंच लिहितो. कोणी यात चूक आहे असं सांगितलं नाही.' (म्हणजे वेगळ्या शब्दात, 'सर, तुमचच काहीतरी चुकतंय !), हे उत्तर मिळतं. सुनील मधला न्हस्व नि आपल्याला खटकत रहाणे व मराठी भाषा व तिचे व्याकरण आपण शिकलो ही चूकच झाली असं वाटायला लागतं. व्याकरण ही संकल्पना दिवसेन् दिवस बाद होत चालली असावी !

भाषा ही जिवंत घटना आहे. प्रवाही आहे, दर पाच-दहा कोसांवर भाषा बदलत असते. दोन भाषांच्या संकरातून भाषेत नवीन शब्द रूढ होत असतात... वगैरे सर्व मान्य करूनही, उच्चारानुसारी व्याकरणाचे तत्व स्वीकारल्यानंतर व्याकरणाच्या ढोबळ चुका समजण्यापलिकडच्या वाटतात. मुंबईतल्या मराठी माणसाच्या भाषेवर तर हिंदी भाषा 'संस्कृती'चा प्रभाव आहे. इतर भाषिक त्याच्या मातृभाषेत बोलताना धेडगुजरी बोलत नाहीत. या विषयावर बोलून प्रश्न सुटणार नाहीत तर मी मराठीतच बोलेन, मराठीतच व्यवहार करेन या संकल्पाने आपली भाषा, आपला भाषा व्यवहार चालवायला हवा.

'दिशा'च्या संपादकीयात हा भाषा विषय मांडण्याचे कारण भाषा व भाषा व्यवहारात आपले आयुष्य व्यतीत करणाऱ्या दोन भाषा प्रभूंचे पुण्यात मे महिन्यात झालेले निधन. भारतीय भाषा भगिनींमध्ये सुसंवाद साधून आंतरभारतीची कल्पना प्रत्यक्ष आणू पहाणारे, भारतीय भाषांचा व्यवहार कोश बनविणारे विश्वनाथ नरवणे आणि राष्ट्रपती पुरस्कार मिळालेले संस्कृत भाषा पंडित डॉ. अ. मा. घाटगे हे ते दोन भाषा प्रभू. पुढच्या पिढ्यांमध्ये असे मूलभूत काम करणारे भाषा शास्त्रज्ञ असतील की नाही, किंबहुना भाषा आपले स्वरूप किती बदलतील हा प्रश्नच आहे. मराठी पुरते बोलायचे तर मराठीत बोलल्या शिवाय, मराठीत व्यवहार केल्याशिवाय कै. सुरेश भटांनी म्हटल्याप्रमाणे 'आपुल्या घरात हाल सोसते मराठी' ही मराठीची हालत सुधारणे कठीण आहे !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ८ / जुलै २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कवी कुलगुरु : कालिदास | श्री. शंकर बा. मठ | ३ |
| २) | संस्कार | सौ. वंदना प्रसादे | १० |
| ३) | श्रीमद्‌भागवत् गीता (अध्याय १६वा) ॥ दैवासुरसंपद्विभागयोग: ॥ | आशा भिडे | १२ |
| ४) | ग्रंथविश्व | श्री. शरद जोशी | १८ |
| ५) | कायझेन | प्रा. विद्याधर वालावलकर | २१ |
| ६) | आम्ही मराठी चित्रपट का पहावा? | गीतेश गजानन शिंदे | २३ |
| ७) | ताण-तणाव | डॉ. सौ. प्रभा जयंत कर्वे | २५ |
| ८) | वाहन विवेक- एक वेगळे पुस्तक | प्रा. विनायक वुरकुले | ३२ |
| ९) | परिसरवार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# कवि कुलगुरु : कालिदास

*आषाढ मासात कालिदास उत्सव साजरा होत असतो. त्या निमित्त हा लेख- संपादक*

**एक श्रेष्ठ कवी -**

हिंदुस्थान देशाला बाह्य जगतात यशस्वीपणे विराजमान व्हावे असे वाटत असेल तर तिने संपूर्ण समाजाला गवसणी घालू शकेल अशा संस्कृत भाषेचा आधारच घेतला पाहिजे. संपूर्ण विश्वात त्याची आवश्यकता भासत आहे. एखाद्या निष्णात चिकित्सकाने निदान करून रुग्णाइताला औषध द्यावे इतकी या भाषेची गरज आहे. संस्कृत भाषेच्या ज्ञानामुळेच या देशातील सभ्यता, संस्कृती मानवी सौहार्दपूर्ण व्यवहार, तसेच शांत, समृद्ध, सुखी आणि समाधानी जीवन प्रत्यक्षात येईल. इतर कोणत्याही भाषेच्या ज्ञानाने, मग त्या प्राचीन असोत वा अर्वाचीन असोत, जिवंत असोत वा मृत असोत, हिंदुस्थानातील वरील प्रकारचे जीवन जगाला विदित होणार नाही. व्यास, वाल्मिकी सारखाच कालिदास हा देखील या देशाच्या सांस्कृतिक जीवनात भर टाकणारा एक श्रेष्ठ संस्कृत कवी होऊन गेला. त्याने संपूर्ण भारतीय जीवनाचा प्रत्यय आपल्या साहित्यातून अभिव्यक्त करून या देशातील श्रेष्ठ जीवनाची दिशा दाखविली.

सर्वसाधारणपणे काव्याचा आस्वाद तीन प्रकारे घेता येतो असे मानण्यात येते. भावात्मक, वर्णनात्मक आणि नाट्यात्मक. साहित्यात या प्रकाराना एक विशेष स्थान प्राप्त झाले आहे. भावात्मक कवी आपल्या तरल बुद्धीने व भावपूर्ण अंत:करणाने आपली कलाकृती जन्माला घालतो. त्यात तो आपल्या भावना, आपले अनुभव, आपले निरीक्षण आणि निसर्गाशी असणारे आपले नाते हे अत्यंत मोहकपणे लयबद्ध शब्दात मांडतो. त्याचे हे शब्द श्रोत्याला सुखवितात. त्या कृतीत तो आपले जीवन ओततो. या काव्याने आपल्या भावनाना वाट करून दिल्याने त्याला समाधान लाभते. वर्णनात्मक कवी एखाद्या पौराणिक वा ऐतिहासिक महापुरुषाची कथा आपल्या काव्यात गुंफतो. त्यात अनेक मानवी व्यवहारांचे तो काव्यमय दर्शन घडवितो. मात्र हे करीत असताना सत्याचा अपलाप होणार नाही व ती कलाकृती योग्य मार्गदर्शन करणारी असेल याची तो काळजी घेतो. नाट्यात्मक कवी हा देखील वर्णनात्मक कवी सारखाच असतो. परंतु तो आपल्या कलाकृतीला नाट्य व अभिनय याची जोड देतो. नट व इतर पात्रे यांच्या द्वारे तो आपल्या शब्दाने अभिनययुक्त नाट्य उभे करतो आणि आपला संदेश अत्यंत सहजतेने व कुशलपणे लोकांपर्यंत पोचवतो. एखाद्या नाट्य कलाकृतीत विश्वव्यापी व त्रिकालाबाधित संदेशही असू शकतो.

वरील वर्णनाप्रमाणे प्राचीन कालचा अन्य कोणताही कवी, कालिदासाखेरीज, या सर्व कसोट्यांना एकत्र सामोरा जाऊ शकलेला नाही. केवळ कालिदासच या तीनही कसोट्यांना सामोरा गेला आहे. ऋतुसंहार व मेघसंदेश (मेघदूत) ही त्याच्या भावकाव्याची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. रघुवंश हे त्यानी लिहिलेले महाकाव्य आहे. आदर्श राजांची जीवन चरित्रे रघुकुलातील राजवंशांच्या माध्यमातून समर्थपणे रेखाटलेली आहे. 'अभिज्ञान शाकुंतलम्' या नाट्य कलाकृतीने कालिदास एक श्रेष्ठ कवी आणि नाटककार म्हणून अमर झाला. 'शाकुंतल' हे नाट्य ही जगातील सर्वोत्कृष्ट कालिदास निर्मित कलाकृती आहे. श्री हर्ष व बाण हे उत्कृष्ट वर्णनात्मक कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. मयुर कवी हा भावकवी म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच भवभूती हा एक उत्कृष्ट नाटककार म्हणून सर्वज्ञात आहे. त्याचे 'उत्तर राम चरितम्' हे अतिशय हृद्य नाटक आहे. असे असले तरी कालिदास हा भावकवी, वर्णनात्मक कवी व नाट्यात्मक कवी या तीनही कवींना मागे टाकतो.

इंग्रजी साहित्याचा विचार केला असतानाही शेक्सपीयर हा नाटककार होता मात्र तो भावात्मक व

वर्णनात्मक कवी नव्हता. मिल्टन केवळ कवी होता तो नाटककार कधीच नव्हता. वर्डस् वर्थ, शेले हे भावकवी होते. त्यांची महाकाव्ये वा नाटके ऐकिवात नाहीत. थोडक्या कल्पकता, भाव व्याकुळता आणि चिंतनशीलता ह्या गोष्टी कवीच्या ठिकाणी असल्यासच तो महाकवी होतो. काही कवीत काही गोष्टी आढळतात परंतु कालिदासाच्या ठिकाणी या तीनही गोष्टी आढळतात.

**कालिदासाची वैचारिक भव्यता -**

शब्द व त्याचा अर्थ हे नेहमीच संपृक्त (अभेद्य) असतात. ते एकमेकाशी निगडित असतात आणि कधीच विलग होत नाहीत. ही अगदी साधी गोष्ट कालिदासाने अतिशय सुंदर पद्धतीने मांडलेली आहे. हे करत असताना त्यातील सौंदर्याचे उदात्तीकरण केले आहे आणि त्याला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले आहे. रघुवंशातील पहिलाच श्लोक याची साक्ष देईल.

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थ प्रति पत्तये । जगत: पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ ॥

इथे कालिदास, शब्द व अर्थ यातील अभेद्यता वर्णन करताना सहज सांगतो की जगताचे माता व पिता पार्वती व परमेश्वर यांच्यातील अभेदा इतकेच शब्द व अर्थ यातील अभेद आहे. असे त्यांचे स्वरूप दाखवून आपली वैचारिक श्रेष्ठता त्याने प्रस्थापित केली आहे. आणखी अनेक उदाहरणे देता येतील. हिमालयाचे वर्णन करताना त्याला देवतात्मा असे संबोधून श्रेष्ठ कलात्मकता अभिव्यक्त केली आहे. त्यामुळेच त्याच्याबद्दल असे म्हटले जाते.

पुरा कवींना गणना प्रसंगे कनिष्ठिकाधिष्ठित कालिदास: ।

अद्यापि तत्तुल्य कवेरभावात् अनामिका सार्थवती बभूव ॥

उत्कृष्ट कवींची यादी तयार करण्याचे ठरवून करंगळीवर सर्वप्रथम कालिदासाचे नाव घेण्यात आले. त्याच्या तोडीचा दुसरा कवी न आढळल्याने करंगळीच्या पुढील बोटावर गणनाच न झाल्याने त्या बोटाला अनामिका हे जे नाव आहे ते सार्थच झाले आहे.

**कालिदासाचा साहित्य प्रवास -**

साहित्याची सुरुवात 'ऋतु संहार' या काव्याने मात्र हळूहळू काव्य फुलत गेले व अंतर्भाव अभिव्यक्त करणाऱ्या सर्व श्रेष्ठ 'रघुवंश' महाकाव्यापर्यन्त त्याची मजल पोहोचली. नाटकामध्ये सर्व श्रेष्ठ व सर्व जगात नावाजलेली कलाकृती त्यानी निर्माण केली. शाकुंतल नाटक सर्वात श्रेष्ठ आहे. एक सुंदर कलाकृती आहे. त्याच्या साहित्यात मनुष्य, देव, दैव आणि अध्यात्म या सर्वांचा संगम सहजपणे झालेला दिसतो. वेद वाङ्मयाशी असलेला त्याचा परिचय, वैदिक संस्कृतीशी असलेले त्याचे घनिष्ट नाते, योग विषयक विपुल ज्ञान, धर्मशास्त्राची पूर्ण माहिती, अद्‌भुत व निश्रेयस या दोन्ही गोष्टी साधून देणारी विचारसरणी आदी गोष्टींचा परिपोष पुरेपुरपणे साहित्यात केलेला आहे. सामाजिक रीतिरिवाज, मनूने घालून दिलेला मार्ग, वर्णाश्रम पद्धती ही त्याच्या दृष्टीने परिणत अवस्था होती. त्याच्या ठिकाणी बुद्धाची करुणा होती. जिना इतकीच अहिंसा वृत्ती होती. मात्र कालिदासाचा मार्ग सनातन वैदिक धर्माचा होता. श्रुती आणि स्मृती यानी घालून दिलेल्या मार्गावर त्याचा पूर्ण विश्वास होता. यम नियम, अहिंसा, सर्वाभूति प्रेम, सत्य अस्तेय, ब्रह्मचर्य अपरिग्रह वृत्ती आदीचे आचरण करण्यावर त्याचा भर होता. थोडक्यात कालिदास सहिष्णु, शांत, समन्वयी स्वभावाचा होता. सामाजिक जीवन अशा प्रकारे त्याने घालविले. प्रत्येक सुख दु:खाच्या क्षणी कालिदास सेवात तत्पर आढळतो. सौंदर्याचा दिलखुलास आनंद लुटत असतानाच तपश्चर्येनेच त्याला पूर्णता येते हे सांगावयास तो विसरत नाही. कालिदासाचे साहित्य शाश्वत आनंद, कल्याण, सौंदर्य प्राप्त करून देणारे आहे. सर्व मानवासाठी त्यानी हे साहित्याचे दालन खुले करून ठेविले आहे. म्हणूनच कालिदासाला जगातील सर्वश्रेष्ठ कवी असे म्हटले आहे.

त्याने सनातन वैदिक संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. त्यासाठी वेद वाङ्मय, पुराणे, विविध कला इत्यादींचा

उपयोग करून घेतला. जागृत देवतेची त्याने जनमानसात प्रतिष्ठापना केली. आपल्या उपासनेतून ती दृढ करावयास लावली. कालिदासामुळे हिंदुस्थान या क्षेत्रात उत्क्रांत होऊ शकला. देवाची भक्ती व माणसाबद्दलचा आदर या दोन्ही गोष्टींची समाजाला अत्यंत गरज भासू लागली. शून्यवाद व कोरडा तर्क याला लोक कंटाळलेले होते. त्याने तत्त्वज्ञानाची सुटसुटीत व्याख्या केली. सर्व सत्य गोष्टींबद्दल नितांत आदर व प्रेम करणे, अत्यंत कुशलपणे डोळे उघडे ठेवून सर्व गोष्टी एकाच ईश तत्वानी व्याप्त आहेत याचा अनुभव घेणे व सर्वांवर प्रेम करणे. सर्वांठायी प्रेम हे पवित्र आचरण आहे. कारण सर्वांतच ईश शक्ती वास करते. अशाच प्रकारचे विश्व-व्यापक प्रेम त्याने आपल्या काव्यातून अभिव्यक्त केले आहे. धर्माच्या बंधनात राहून प्रेम करा हेच सर्व व्यापक शाश्वत प्रेम आहे, अशी त्याची शिकवण असल्याचे ध्यानात येते.

### तत्त्वज्ञ कालिदास -

कालिदास केवळ कवीच नव्हता तो तत्त्वज्ञही होता. तत्ववेत्ता व धर्मनिष्ठा या दोहोत तो उच्च कोटीचा वाटतो. कालिदासाच्या काव्यातून केवळ कवीची प्रतिभा व्यक्त होत नसून, दर्शन, कल्पसूत्रे, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, कामशास्त्र, ज्योतिष, उपनिषद् विचार इत्यादींचे उल्लेख आढळतात. त्याच्या नाटकातील नांदी ही देखील उपनिषदातील तत्त्वज्ञानच विशद करतात. शिव हा सर्व विश्वाचा पालनकर्ता असून तो सर्व दोषापासून पूर्ण अलिप्त आहे. 'प्रत्यक्षाभि: अष्टाभि: तनूभि:' शिवाची अष्टविध शरीरे असल्याचे 'शांकुतल' नाटकाच्या नांदीत म्हटले आहे. विक्रमोर्वशीय नाटकाच्या नांदीत शिव हा संपूर्ण विश्वाला व्यापून राहणारा आहे असे वेदान्त तत्व सांगितले आहे. कवीला मूर्त स्वरूप ब्रह्म अपेक्षित आहे. मालविकाग्निमित्र या नाटकातील पंडिता परिव्राजिका कौशिकीला उद्देशून कवी म्हणतो - 'मंगलालंकृता भाति कौशिक्या यतिवेषा । त्रयी विग्रहवत्येन सममध्यात्मविद्यया।' अध्यात्म विद्येशिवाय वेदत्रयी निष्प्रभ आहे. असे असताना देखील कालिदासाने कुठेही माया, अविद्या, मिथ्य इत्यादी तत्त्वज्ञानातले शब्द वापरलेले नाहीत.

### कालिदासाची प्रेमविषयक संकल्पना -

प्रेमाची महती मोठी आहे. कनिष्ठ श्रेणीतले प्रेम, दया, करुणा यात परिणत होते. तीच बरोबरीच्या नात्यात स्नेह, सख्य यात परिणत होते. आणि श्रेष्ठ स्वरुपातील प्रेम, भक्तीत परिणत होते. निर्हेतुक प्रेम हे सर्वश्रेष्ठ. शकुंतलेचे निर्व्याज निसर्ग प्रेम या प्रकारचे आहे. हरिणी, सखीजन, पालन कर्ता पिता यांच्यावरील प्रेमही निर्व्याज आहे. वियोगात प्रेमाची खरी कसोटी लागते. प्रेमच सत्य. परिस्थितीजन्य प्रेम हे प्रेमच आहे. परिस्थिती प्रमाणे बदलणारे प्रेम याला अर्थच राहत नाही. दृष्टीआड गेले, प्रेम सरले. हे प्रेम नव्हेच. प्रेम म्हणजे आत्म्याचा सौंदर्यपूर्ण हुंकार आणि मानवी सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्त्वाची परिपूर्णता. प्रेमाने जीवन उजळते. प्रेरणा मिळते आणि सौंदर्यमय होते. पश्चात्ताप अंत:करणाने शुद्ध प्रेम उदय पावते आणि हेच प्रेम गौरवास्पद व श्रेष्ठ ठरते. यामुळेच कनिष्ठ व श्रेष्ठ प्रेम ध्यानात येते. प्रेम करणे म्हणजे प्रेमपूर्ण जगणे आणि जगणे म्हणजे सेवारत असणे. कोणतेही संकट सोसणे हेच खरे प्रेम. प्रेमात प्रतिकार नसतो तर असतो फक्त स्वीकार.

### कालिदासाचा काल -

सर्व जगाला ललामभूत असलेला एवढा महान कवी, पण तो केव्हा होऊन गेला, कुठे जन्मला याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. अद्याप तर्कवितर्कच लढविले जात आहेत. भारतातील प्राचीन इतिहासाबद्दल संदिग्धताच आढळते. कैलास लेणे कुणी निर्माण केले, मोठमोठाले स्तूप बांधणारे कोण होते. अजिंठ्यातील चित्रे रेखाटणारे कला तपस्वी कोण होते. ज्यांनी आपल्या प्रतिभेने ज्ञानाचा दिवा सतत तेवत ठेविला ते व्यास, वाल्मिकी आणि कालिदास, कोठे कधी जन्माला आले. त्यांच्या ठिकाणी कोणती प्रेरणा होती ज्यामुळे ते असे श्रेष्ठ प्रकारचे साहित्य निर्माण करू शकले. भारताची श्रेष्ठ परंपरा यातच आढळते.

स्वत:च्या विनाशी स्वरुपाचा थोडाही विचार जगापुढे न मांडता सर्व जीवन व्यापून टाकणारी महान् कलाकृतीच आपल्या पश्चात चिरकाल टिकावी या प्रेरणेने भारून गेलेल्या या मंडळींनी आपल्या वैयक्तिक जीवनाविषयी काहीही लिहून ठेविलेले नाही. ते खरे कर्मयोगी होते. त्यांच्या ठिकाणी अहंकाराचा मद अगर फलाची आशा अजिबात आढळत नाही. आपली कलाकृती उत्कृष्ट असावी आणि ती निरंतर आनंद देणारी असावी इतकेच त्यांना अभिप्रेत होते.

कवी कुलगुरु कालिदास हा संस्कृत भाषेचा एक महान् कवी व श्रेष्ठ नाटककार होऊन गेला. त्याने स्वत:विषयी आपल्या ग्रंथात कुठेच माहिती लिहून ठेवलेली नाही. त्याचे विश्वसनीय चरित्रही उपलब्ध नाही. त्याच्या स्थळकालाविषयी विद्वानात मतभेद आहेत. त्याच्या जन्मकालाबद्दल अनेक तर्क विद्वानाकडून करण्यात आले आहेत व येत आहेत. काही तर्क येणेप्रमाणे आहेत.

१) जन्मकाल खिस्तपूर्व दुसरे शतक २) खिस्तपूर्व पहिले शतक ३) खिस्तोत्तर पाचवे शतक ४) खिस्तोत्तर सहावे शतक ५) खिस्तोत्तर अकरावे शतक. थोडक्यात बाराशे वर्षापेक्षा अधिक अशा प्रदीर्घ काळात कालिदास केव्हातरी जन्मला असावा असे या विद्वान मंडळींच्या विधानांवरून ध्यानात येते. या विद्वान मंडळींनी आपली मतेही मांडलेली आहे.

**खिस्त उत्तर पाचवे शतक -**

याबद्दल विद्वानांनी बऱ्याच अंशी उपयुक्त होवू शकतील अशी मते मांडलेली आहेत. विक्रमोर्वशीय नाटकातील नायक हा पुरुरवा असताना कालिदासाने विक्रम राजाच्या गौरवार्थ आपल्या नाटकाला 'विक्रमोर्वशीयम्' असे नाव दिले आहे. हा विक्रमराजा गुप्त वंशातला असे मानले गेले आहे. चंद्रगुप्त दुसरा याला विक्रमादित्य असे म्हणत. आणखी एक पुरावा - प्रवरसेन हा वाकाटक राजाच्या दरबारी ४१०-४४० (खिस्तोत्तर) मध्ये होता. त्याचे 'सेतुबंध' हे काव्य कालिदासाने शुद्ध केले. मंदसोर येथील शिलालेखात (खिस्तोत्तर ४७२) कालिदासाच्या 'मेघसंदेश' या काव्यातील पंक्ती आढळतात. बुलहरच्या मते रघुवंशात कामंदकनीतिसारातील उतारे आढळतात. कामंदक हा खिस्तोत्तर तिसऱ्या शतकात होऊन गेला. शिवाय भास कवींचा उल्लेख कालिदासाने मालविकाग्निमित्र या नाटकाच्या प्रस्तावनेत केलेला आहे. भास हा खिस्तोत्तर तिसऱ्या शतकात होऊन गेला. शिवाय डॉ. भांडारकर व म.म.वा. वि. मिराशी यांच्या मते कालिदास गुप्त घराण्यातील द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्य याच्या आश्रयाला होता. चंद्रगुप्ताने खिस्तोत्तर ३८० ते ४१३ या कालखंडात राज्य केले. यावरील पुराव्यावरून विद्वानांच्या मते कालिदास हा खिस्तोत्तर ४ थे ते ६ वे या शतकात होऊन गेला असे म्हणणे ग्राह्य धरावेसे वाटते.

त्याच्या जन्म स्थलाबद्दलही वाद आहेच. हिमालयाच्या गढवाल प्रदेशातला कालिदास असावा कारण आपल्या 'कुमार संभव' या काव्यात हिमालयाची पुरेपूर माहिती त्याने दिलेली आहे. तेथील उत्तुंग शिखरे, उमा महेश्वराच्या वास्तव्याने पुनीत झालेली स्थाने अत्यंत मांगल्यपूर्वक व आदराने त्याने वर्णिली आहेत. तो तेथील असल्याशिवाय हिमालयाचे एवढे वर्णन कसे करू शकेल? हिमालयाला त्याने देवात्मा म्हटले आहे. कारण महेश्वराचे ते वसतिस्थान आहे. तो शिवाचा नि:सीम भक्त होता. प्रत्येक प्रांतातील लोकच त्याला आपल्या प्रांतातला असे मानतात. खालील श्लोकावरून हे आपल्या ध्यानात येईल.

आहु: केचन कालिदास उद्भूत कश्मीर देशे परे ।
कर्णाटे कतिचित् च वङ्ग मिथिला मध्य प्रदेशादिषु ।
मन्येऽयं हिमशैल भूमितनयो भ्रान्त्वाऽखिले भारते ।
क्षिप्रावेत्रवती तटेषु गमयत् स्वं जीवनं निवृत्त: ॥

**पाश्चात्य विद्वानांचे प्रशंसोद्गार**

शाकुंतल नाटक वाचून जर्मन कवी गटे याला अतिशय आनंद झाला आणि आनंदाने तो नाचला. या नाटकाबद्दल खालीलप्रमाणे उद्गार काढले.

Wouldst thou the young years blossoms and the fruit of its decline.

And all by which the soul is charmed, in raptured fed,

Wouldst thou the earth & heaven itself in one sole combine,

I name the O Shakuntala and all, at once is said

वासन्तं कुसुमं फलंच युगपत् ग्रीष्मस्य सर्वंच यत् ।
यच्चान्यत् मनसो रसायन मत: सन्तर्पणं मोहनं
एकीभूतमभूत पूर्वमथवा स्वर्लोकभूलोकयो:
ऐश्वर्यं यदि वाञ्छसि प्रियसखे शाकुंतलं सेव्यताम् ।
(वरील ओळींचे संस्कृत भाषांतर)

**सर मोनिअर विल्यमस् म्हणतो -**

कालिदासाच्या काव्य शक्तीची तुलनाच करता येणार नाही. त्याची विशाल कल्पकता, त्यातील माधुर्य आणि स्वच्छन्दता, मानवी अन्त:करणातील भावनांचे ज्ञान, अत्यंत कोमल भावनांचा कल्लोळ, कला कृतीत त्या आविष्कृत करताना आढळणारी हळुवारता, मानवी व्यवहाराची पूर्ण जाणीव, संघर्ष भावनांची उकल या सर्व गोष्टींचा विचार करताना हा हिंदुस्थानातील शेक्सपीअर आहे असे म्हणावेसे वाटते.

**व्हन हंबोलट म्हणतो -**

कालिदास हा नैसर्गिक मानवी मन प्रभावित कसे होईल याचे समर्थपणे वर्णन करणारा कवी आहे. विशेषत: प्रेमी युगुलांचे कोमल भाव, भावनांचे तरल, हळुवार आणि मोहक वर्णन केले आहे. यामुळे कवीजनात त्याने आपले स्वत:चे श्रेष्ठ स्थान सहजतया प्रस्थापित केले आहे. विश्वातील अनेक कवीजनात तो श्रेष्ठ म्हणूनच गणला जातो. शाकुंतल ही नाट्य कलाकृति जगातील एक उत्कृष्ट व भव्य कलाकृती आहे. ती कलाकृती आपल्या सर्वांचे वैभवच आहे.

**ही कलाकृती श्रेष्ठ का?**

या कलाकृतीत कोठेही संकुचितपणा नाही. हिंदुस्थानातील दिव्य जीवनाचा तो आविष्कार आहे. त्याच्या कृतीतील आश्रमवासी ऋषिजन संपूर्ण विश्वाचा विचार करणारे आहेत. सर्व जगाबद्दल त्यांना अपार करुणा आहे. जीवनाबद्दल त्यांचा उदार दृष्टिकोण आढळतो. त्यांच्या कृतीत मनुष्य देव व निसर्ग यांचे परस्पर ठासणारे अपार प्रेम पाहावयास मिळते. हे नाटक एका शांत आश्रमात जन्म घेते तसेच शांत व समाधानी अशा दुसऱ्या आश्रमाच्या क्षेत्रात विराम पावते. पहिला आहे कण्व ऋषींचे आश्रम व दुसरा मारिच आश्रम. म्हणजे शांततेकडून शांततेकडे असा हा जीवनप्रवास आहे. हीच हिंदु संस्कृतीची थोरवी आहे. शांति, पुष्टि आणि तुष्टि हे सनातन धर्माचे ब्रीद आहे. उत्कृष्ट आर्य कसा असतो याचे प्रत्यक्ष रुप कालिदासाने दुष्यन्ताचे व्यक्तिरेखाटण करून दाखविले आहे. तो राजा असून राजाची सारी कर्तव्ये तो धर्माच्या चाकोरीत राहून पालन करीत असल्याचे दाखविले आहे. आश्रमातील मृगांची हत्या तो करीत नाही. आश्रमात जाऊन ऋषिजनांच्या भेटीने आपण पुनीत होऊ अशी त्याची धारणा आढळते. आश्रमात प्रवेश करताना राजाचा डामडौल बाजूला ठेवून नम्रतेने प्रवेश करतो. या वागण्याने राजाची शालीनता व्यक्त होत आहे.

दुष्यन्त हा राजा मृगया करण्याकरता निघालेला होता. हरिणीच्या मागे लागून तो कण्वाश्रमापर्यंत येतो. तिथे त्याला कळले की हा आश्रम मृग आहे. तिथे ऋषिकुमार त्याला सांगतात - 'आश्रम मृग: अयं न हन्तव्य: ।' पुढे त्याला म्हणतात जे पीडित असतात त्यांच्या रक्षणासाठी तुझे शस्त्र असून मुक्या निरागस प्राण्याना मारण्यासाठी नाही. 'आर्त त्राणाय व: शस्त्रं न प्रहर्तु अनागसि ।' राजा त्यांचे ऐकतो. जवळच कण्व ऋषींचा आश्रम असल्याचे ते सांगतात. हे कळताच तो त्यांच्या दर्शनासाठी जाण्याचे ठरवितो. 'पुण्याश्रय दर्शनेन तावत् आत्मानं पुनीमहे ।' त्यांच्या दर्शनाने अपाण पावन होऊ असे त्याला वाटते. इतकेच काय आत प्रवेश करण्यापूर्वी सर्व राजचिन्हे तो

काढून ठेवतो. कारण अत्यंत नम्रतेने आश्रमात प्रवेश केला पाहिजे ही जाणीव त्याच्या ठिकाणी आढळते. 'विनीत वेषेण प्रवेष्टव्यानि तपोवनानि नाम' ही भारतीय सभ्यता आहे. या सभ्यतेचे दर्शन कालिदासाने दुष्यंत राजाच्या आचरणातून घडविले आहे. राजाच्या ठिकाणी असलेली नम्रता व धर्माच्या चौकटीत राहून व्यवहार करण्याची तत्परता या गोष्टी ध्यानात येतात.

कालिदासाने एकूण तीन नाटके - मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय आणि अभिज्ञान शाकुंतल लिहिली. मेघदूत हे खंडकाव्य, कुमार संभव व रघुवंश ही दोन महाकाव्ये लिहिली. सुरुवात ऋतुसंहार काव्याने केली. प्रत्येक ऋतुतील वैशिष्ट्ये सांगून मानवी जीवनावर त्यांचा कसा परिणाम होतो हे फार सुंदर पद्धतीने या काव्यात वर्णन केले आहे.

वरील तीन नाटकातील काही विशेष श्लोक अवलोकन केल्यास कालिदासाची प्रतिभा व वैचारिक भव्यता ध्यानात येईल.

मालविकाग्नि मित्र - नांदी - एकैश्वर्यस्थितोऽपि प्रणत बुफल: य स्वयंकृत्तीवासा: ।

कान्तासंमिश्रदेहोऽपि अविषय मनसां य: पुरस्तात् यतीनाम् ।

अष्टाभि: यस्यकृत्स्नं जगदपि तनुभि: बिभ्रतो नाभिमान: ।

सन्मार्गालोकनाय व्यपनयतु स व: तामसींवृत्तिमीश: ॥

शिव हा उपासनेचा विषय आहे. आपली तामसी वृत्ती नाहीशी करून आम्हाला सन्मार्गदर्शक होवो अशी इच्छा कालिदासाने प्रगट केली आहे.

प्रथित यशसां भास सौमिल्ल कवी पुत्रादिनां प्रबन्धान् अविक्रम्य वर्तमान कवे: कालिदासस्य क्रियायां कथं बहुमान: । प्रसिद्ध भास सौमिल्ल आदी कवीना बाजूला सारून नुकताच उदयाला येत असलेल्या कालिदासाची कलाकृति ही श्रेष्ठ कशी ठरेल? त्यावर कालिदास म्हणतो.

पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमिति अवद्यम् ।

सन्त: परीक्ष्य अन्यतरात् भजन्ते मूढ: परप्रत्ययनेय बुद्धि : ॥

जुने सर्वच काही चांगले असते असे नव्हे व नवीन काव्य कमी प्रतीचेच असते असेही म्हणता येणार नाही. सज्जन माणसे योग्य तो विचार करूनच त्याचा स्वीकार करतात मात्र मंद बुद्धीचे लोक इतरांच्या कलाप्रमाणे वागतात व पुनर् अस्माकं वृथा नाट्यं प्रति गौरवम् - आम्ही उगाच नाटकाची प्रशंसा करू इच्छित नाही. नाटका संबंधीची कल्पना स्पष्ट करताना कालिदास म्हणतो -

देवानामिदमामनन्ति मुनय: शान्तं क्रतुं चाक्षुषं
रुद्रेणेदमुमाकृतं व्यतिकरे स्वाङ्गे विभक्तं द्विधा
त्रैगुण्योध्दवमत्र लाके चरितं नानारदृश्यते
नाट्यं भिन्नरुचे: जनस्य बहुधाप्येकं सभाराधनम् ।

देवादिकांना तोषविण्याकरता हे शांत स्वरूपाचे चाक्षुष (पाहावयाचे) यज्ञ आहे. उमेच्या आनंदासाठी रुद्राने आपल्या अंगाचे दोन भाग करून अर्धनारी नट निर्माण केले. सत्वरजतम आदी गुणानु युक्त जनांचे विविध व्यवहार रसात्मकतेने आस्वादिले जातात अशाप्रकारे विविध वृत्तीच्या लोकाना त्यांच्या त्यांच्या कल्पनेतून आस्वाद घेता येईल असे हे नाट्य आहे.

विक्रमोर्वशीय नाटकात उर्वशी सौंदर्यांबद्दलचा श्लोक-

अस्या: सर्गविधौ प्रजापतिरभूत् चन्द्रोनु कान्तिप्रद: ।
शृंगारैकरस: स्वयंनुमदनो मासो नु पुष्पाकर: ।
वेदाभ्यास जड: कथं नु विषय व्यावृत्त कौतुहल:
निर्मातुं प्रभवेत् मनोहरमिदं रूपं पुराणोमुनि: ॥

राजा उर्वशीला पाहून म्हणतो - हे असे सुकोमल व मनोहर रुप घडविताना ब्रह्मा नक्कीच प्रकाशणारा चंद्र झाला असला पाहिजे, सर्व शृंगाराचा मेरु मणि मदन झाला असला पाहिजे अथवा वसंत ऋतु झाला असला पाहिजे अन्यथा गहन अशा तत्त्वज्ञानात बुडलेल्या प्रजापतीला इतकी सुंदर

वस्तु कशी निर्माण करता येईल.

**शाकुंतल नाटक -**

काव्येषु नाटकं रम्यं तथापिच शकुंतला । तत्र अपि चतुर्थोंक: तत्र श्लोक चतुष्टयम् ।

या नाटकातील चौथा अंक बहारीचा असून त्या अंकातील चार श्लोक उत्कृष्ट आहेत. शकुंतला सासरी निघते त्यावेळी कण्व ऋषींचे मन व्याकूळ होते. हृदय हेलावते. माझे डोळे पाण्याने भरून गेले आहेत. गळा दाटून आला आहे. मी शकुंतलेला स्नेहाने वाढविले आहे. माझ्यासारख्या माणसाची ही स्थिती होते. खरोखरच मुलगी सासरी जाताना खऱ्या मातापित्यांची काय अवस्था होत असेल. पीडयन्ते गृहिण: कथं नु तनय: विश्लेष दुःखै नवै: । हा चिरकाळ येणारा अनुभव इथे वर्णिला आहे. ती सासरी निघाली हे पाहून कण्व सर्व लता वेलीना सांगतात, लतावेलींनो तुम्हाला प्रथम पाणी दिल्याशिवाय जी अन्न सेवन करत नसे, तुमच्या फुलांच्या बहरात जी उत्सव साजरा करी अशी तुमची शकुंतला पतिगृही जात आहे तिला परवानगी द्या. सेयं याति शकुन्तला पतिगृहं सर्वै: अनुज्ञायताम् । निसर्ग व मानव यांचे हृद्य असे नाते कालिदासाने किती चांगल्या पद्धतीने वर्णिले आहे हे ध्यानात येईल. सासरी जात असताना पिता लेकीला उपदेश करतो. सासरी नीट वाग उद्दामपणा करू नको. सर्वांशी जुळवून घे असे वागलीस तरच कुलाचे नाव राखशील नाहीतर कुलाला बट्टा आणशील. हा उपदेश आजही किती महत्वाचा आहे, याचा अनुभव प्रत्येकालाच येत असतो. यान्त्येवं गृहणीपदं युवतयो वामा: कुलस्याधय: । कन्या ही परकीय वस्तु आहे. तिला तिच्या घरी पाठविल्यानेच पित्याला समाधान लाभते. प्रत्यर्पितन्यास - इवान्तरात्मा । हे शाश्वत सत्य कालिदासाने अत्यंत हळुवारपणे विशद केले आहे. अशाप्रकारे भारतीय संस्कृती किती उदात्त आहे, याचा परिचय करून दिला आहे.

**कालिदासाचे रघुवंश काव्य -**

ही त्याची सर्वांत शेवटी कलाकृती आहे. एक श्रेष्ठ महाकाव्य आहे. रघुवंशातील दिलीप राजापासून वर्णन सुरू करून त्या वंशातील जवळ जवळ एकोणतीस राजांची वर्णने केलेली आहेत. दिलीपानंतर रघु त्यानंतर अज व मग दशरथ - एकाहून एक श्रेष्ठ राजांची मालिकाच कालिदासाने आपल्या महाकाव्यात उभी केली आहे. या रघुकुलातील राजांबद्दल तो म्हणतो, सोऽहं आजन्मशुद्धानां रघूणां अन्वयं वक्ष्ये - मी आता ज्मादारभ्यं शुद्धचारित्र्याने जीवन व्यतीत करणाऱ्या रघुकुळातील वंशजांचे वर्णन करतो. ते राजे कसे होते - फलप्राप्ती पर्यंत प्रयत्नशील असणारे याचकांचे समाधान करणारे, अपराधी माणसाला त्याच्या अपराधाप्रमाणे दण्ड करणारे, सतत कालाचे भान ठेवणारे, वाटप करण्यासाठीच संपत्तीचा संचय करणारे, मितभाषी, यश प्राप्तीसाठी झटणारे - चारही आश्रम योग्य पद्धतीने पाळणारे - तरुणपणापर्यंत विद्याभ्यास, तारुण्यात यथेच्छ उपभोग, वृद्धापकाळी वानप्रस्थ स्वीकारून शेवट, योग मार्गाने संन्यस्त वृत्तीधारण करून देह विसर्जित करणारे होते. अशा पद्धतीने आदर्शपूर्ण जीवन व्यतीत करणाऱ्या राजे लोकांचा हा वंश आहे. या वर्णनातून कालिदासाने त्यावेळची राजे मंडळी धर्माच्या विशाल चौकटीत राहून प्रजापालन करीत होती, हे स्पष्ट केले आहे. ही प्राचीन राज्यपद्धती लोकांच्याही अंगवळणी कशी पडली होती हेही सांगितले आहे. राजे लोकच काटेकोरप्रमाणे वागत असल्यामुळे प्रजा देखील मनूने घालून दिलेल्या मर्यादांचे तसूभरही उल्लंघन न करता मळलेल्या मार्गानेच व्यवहरत असे. 'रेखामात्रं अपिक्षुण्णात् आमनोर्वर्त्मन: परम् । न व्यतीयु: प्रजास्तस्य नियन्तुर्नेमिवृत्तय: ।

त्यावेळी प्रजेचे रक्षण व पालनपोषण अतिश्रेष्ठ प्रकारचे होते हे सांगत असताना दिलीप राजा कसा वागत असे याचे वर्णन अवलोकन करण्यासारखे आहे.

प्रजानां विनयाधाना द्रक्षणाद्भरणादपि । स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतव: ।

प्रजेला शिक्षण देणे त्यांची देखभाल करणे, त्यांचे रक्षण करणे त्यांच्या पोटापाण्याची सोय करणे हे सारे दिलीप राजा करीत असे. यामुळे खऱ्या अर्थाने हा राजा प्रजेचा

(पान क्र. ११ वर)

# संस्कार

*काळ कितीही बदलला तरी चांगल्या संस्कारांचे महत्व अबाधित आहे. या सुसंस्काराबाबत प्रकट चिंतन*

*- संपादक*

संस्कार म्हणजे वळण, योग्य दिशा, आदर्श. हे संस्कार बाळ जन्मल्यापासून म्हणण्यापेक्षा ते आईच्या पोटात असल्यापासूनच होत असतात. वातावरण, आजूबाजूचा परिसर याचा सतत परिणाम त्यावर होत असतो.

बाळाला घास भरवताना आई म्हणते, 'काऊ ये, चिऊ ये, दाणा खा, पाणी पी' यातून खातानाही इतरांचा विचार करायला शिकवते. जिजाऊने पुराणातल्या कथा सांगून तसेच वेळोवेळी शिवरायांच्या मागे खंबीर उभे राहून जे संस्कार घडवले, म्हणूनच ते युगपुरुष बनले. शामच्या आईने बारीक-सारीक घटनांतून श्यामला संस्कार घटवले. 'पत्रावळ बनवल्याशिवाय जेवण देणार नाही.', यातून स्वावलंबन शिकवले. आज 'श्यामची आई' सर्व महाराष्ट्राला सुपरिचित आहे. असे उत्तम संस्कार करणाऱ्या आई असतातही; पण त्याच अनुकरण करणारे श्याम असायला हवे ना?

यासाठी आचरण शुद्ध हवे. आज आपण पाश्चात्य संस्कृतीच्या मागे लागून आपण आपले संस्कार विसरत चाललो आहोत.

आज कोणी पाहुणे आले की आई-वडील मुलांना कौतुकाने एखाद्या सिनेमातील नृत्य करायला सांगतात किंवा एखादी (कविता) म्हणायला सांगतात. पण त्याचबरोबर एखादा गीतेचा अध्याय किंवा एखादा श्लोक पाठ असायला नको का? यासाठी आपले मनोबल उत्तम असायला हवे. एकाच घरातील दोन मुले, एक चांगला, एक वाईट अशी उदाहरणे का असतात? तर बाहेर कितीही प्रलोभने आपल्याला खुणावत असली तरी आपला निश्चय पक्का हवा.

विनोबा भावे यांच्या लहानपणी एकदा आई स्वत:च्या घरातला स्वयंपाक आवरून शेजारचा स्वयंपाक करायला गेली कारण त्या घरातील स्त्री आजारी होती. आई घरी आल्यावर विनोबांनी विचारले, 'आई हे तू योग्य करतेस का? आधी आपला स्वयंपाक मग त्यांचा स्वयंपाक म्हणजे यात तुझा स्वार्थ नाही का?' तेव्हा आईने समजावले असे 'आपल्याला गार अन्न चालेल, त्या घरातील लोकांना जेवणाच्या वेळी गरम अन्न मिळावे, आजारी स्त्रीला वाढून यावे म्हणून मी उशीरा जाते.' विनोबांना आपली चूक कळली आणि मातेची थोरवीही!

रामदासस्वामी लहान असताना समाजातील न पटणाऱ्या घटनांवर विचार करीत अडगळीच्या खोलीत बसले. आई शोधत आल्यावर ती म्हणाली, 'इथे काय करतोयस?' तेव्हा ते म्हणाले, 'चिंता करतो विश्वाची.' तेव्हा ती माऊली म्हणाली, 'नुसत्या चिंतेने प्रश्न सुटणार नाहीत, त्यासाठी बाहेर पड.' हे वाक्य रामदासस्वामींच्या मनात खोल रुजले आणि रामदासस्वामी महान कार्यासाठी निघून गेले.



**धन्य त्या माता व त्यांची मुले!**

यातूनही आपल्यावर संस्कार घडत असतात व ते आपण जतन केले पाहिजेत.

अन्नातूनही संस्कार घडत असतात. शिजवणाऱ्याच्या मनातले बरे-वाईट संस्कार अन्नावर होतात. म्हणून पूर्वी बरेच लोक परान्न घेत नसत.

लबाडीने मिळवलेल्या अन्नापेक्षा कष्टाची मीठभाकरी कधीही चांगली!

संस्कार हे काय फक्त आईनेच करायचे असतात? तर कुंती पुत्र गुणी असतात तर दुर्योधनच का अधर्मी निघाला. संस्कार नुसते करून उपयोग नसतो तर त्याचे आचरण हवे. जेव्हा गांधारीने दुर्योधनाला निवस्त्र होऊन अंघोळ करून समोर यायला सांगितले तेव्हा कृष्ण समोर आला व त्याने कमरेस बांधले. गांधारीने संपूर्ण डोळ्यात साठवलेली शक्ती, शिवभक्तीने पुत्रास वज्रदेही केले व त्याचा कमरेचा भाग तसाच राहिला तेव्हा ती दुर्योधनाला म्हणाली, 'तू पूर्वी पासून मोठ्यांचे ऐकत नाही. आजही तू माझी आज्ञा पाळली नाहीस आणि तूच तुझ्या नाशास कारणीभूत झालास !'

चांगले वाचन, मनन, अध्ययन यातूनही सतत संस्कार घडत असतात. आपणच आपल्या चुका शोधून सुधारण्याचा प्रयत्न करू शकतो.

सुसंस्कार असतील तर तुमचे एक आदर्श व्यक्तिमत्त्व तयार होते. तुमचे चालणे, वागणे, बसणे, उठणे, बोलणे या सर्व हालचालीतून तुमचे संस्कार डोकावत असतात. समोरची व्यक्ती ते पडताळत असते आणि सुसंस्कारित माणसेच मानाला पात्र ठरतात.

**सौ. वंदना सं. प्रसादे**
ठाणे (प.)
दूरध्वनी : ५४००६५२

## श्रद्धांजली

- भाषा प्रभू विश्वनाथ वाकणे
- भाषातज्ज्ञ डॉ. अ. म. घाटगे
- गझल सम्राट सुरेश भट
- कविवर्य म. पां. भावे
- ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष द. वा. करमरकर
- सार्वजनिक ग्रंथालयाचे ज्येष्ठ कार्यकर्ते रा. हा. शिंदे

*या व अशा तळमळीच्या माणसांचे जाणे चटका लावणारे असते, त्यांना विनम्र श्रद्धांजली*

(पान क्र. ९ वरून चालू)

**कवि कुलगुरु : कालिदास**

पिता होता, मातापितरे केवळ जन्मदाते होते. यावरून 'राजा प्रकृति रंजनात्' प्रजापालन हेच एकमेव कर्तव्य कसे पाळले जात होते याचे व्यापक दिग्दर्शन होते.

अशा राजांचे वर्णन करणे हे किती कठीण आहे यासाठी तो म्हणतो कुठे सूर्यवंशी रघुकुळातील राजे व कुठे माझी अल्पबुद्धी. क्व सूर्य प्रभवो वंशः क्व चाल्प विषयामतिः । एखाद्या छोट्या नावेतून संपूर्ण सागर ओलांडून जाण्याच्या विचारासारखा हा भ्रमात्मक प्रयास आहे. तितीर्षुः दुस्तरं मोहात् उडुपेनास्मि सागरम् । मी एक सामान्य बुद्धीचा तरी प्रसिद्ध कवींना लाभणारे यश संपादन करू इच्छिणारा, खरोखरच हास्यास्पद गोष्ट करण्यास प्रवृत्त झालो आहे. हा माझा प्रयत्न म्हणजे एखाद्या ठेंगू माणसाने उंच अशा झाडावरील फळ आपल्या हाताने तोडू पाहण्यासारखेच नाही काय? मन्दः कवीयशः प्रार्थी गमिष्यामि उपहास्यताम् । प्रांशुलभ्ये फले मोहात् उद्बाहुरिववामनः ।

सर्वश्रेष्ठ कवीचे हे उद्गार पाहून तो किति नम्र आहे. 'विद्या विनयेन शोभते' ही भारतीय शिकवण त्याच्या ठिकाणी किती खोलवर रुजलेली आहे. हे ध्यानात येईल. त्याच्या इतरही कलाकृतीतून भारतीय संस्कृतीला पोषक असलेली अनेक उदाहरणे आढळतात. या कवीने आपणा सर्वांसाठी साहित्याच्या माध्यमातून ती अवलोकन करण्यासाठी दालन खुले करून ठेवले आहे. त्याचा मनसोक्त आस्वाद घ्यावा हेच योग्य !

**शं. वा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

# श्रीमद्भगवत् गीता (अध्याय १६ वा) ॥ दैवासुरसंपद्विभागयोगः ॥

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

श्रीमती भिडे यांचा गीतेवरील लेखमालेतील हा १६ व्या अध्यायावरील लेख. - संपादक

'ज्ञानी पुरुषाला आत्मलाभ झाला की त्याला असीम परमानंदाची प्राप्ती होते व त्यामुळे काही मिळवायचे शिल्लक रहात नाही.' पंधराव्या अध्यायाच्या शेवटी भगवंतांनी असे सांगितले आहे. परंतु ज्या ज्ञानामुळे ही कृतकृत्यतेची स्थिती प्राप्त होते ते ज्ञान कशामुळे प्राप्त होईल व ते एकदा प्राप्त झाल्यावरही आडमार्गाला न जाता त्याचा जीवनप्रवास योग्य मार्गाने कसा चालू राहील हे समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठीच ही ज्ञानाला अनुकूल अशी दैवी संपत्ती व प्रतिकूल अशी आसुरी संपत्ती या अध्यायात भगवंत सांगणार आहेत. हाच विषय सांगायला नवव्या अध्यायात भगवंतांनी सुरुवातही केली होती. (९-११-१२-१३) पण दुसरा विषय पुढे आल्यामुळे ते सांगायचे राहूनच गेले. म्हणून पुन्हा तोच विचार सविस्तर सांगत आहेत.

मोक्षाला नेणारी दैवी संपत्ती व नरकाला नेणारी आसुरी संपत्ती हे दोन्ही अनादिसिद्ध भिन्न मार्ग आहेत. एवढ्याकरिता आसुरी संपत्तीची नीट ओळख असणे आवश्यक आहे म्हणून आसुरी संपत्तीही देव सांगत आहेत. दैवी संपत्तीचे (दैवी गुणांनी युक्त समाज) व आसुरी संपत्तीचे (देहकेन्द्रित आसुरी गुणांनी युक्त समाज) असे दोन प्रकारचे प्राणी या लोकी उत्पन्न होतात. यापैकी दैवी संपत्तीचे म्हणजे सात्त्विक सद्गुणांचे वर्णन मी आतापर्यंत स्थितप्रज्ञ लक्षणे, भक्तीमान पुरुष, गुणातीत, कर्मयोगी, ज्ञानी वगैरे द्वारा केलेले आहे. आता दैवी संपत्तीच्या अगदी विरुद्ध असणारी, सर्व दोषांनी युक्त अशा आसुरी संपत्तीचे वर्णन मजकडून ऐक. भागवत्गीतेने यानिमित्ताने सामाजिक दोष अचूकपणे दाखवले आहेत. समाजाने अंतर्मुख होऊन त्याचा विचार करायला हवा.

जीवनातील प्रत्येक कर्मात परमार्थ भरलेला असावा म्हणजेच जीवन हे सेवामय, ज्ञानमय व प्रेममय असावे. हाच पुरुषोत्तम योग (अ.१५) कर्म, ज्ञान व भक्ती यांची एकरुपता, तीच परमदशा, जीवनाची अंतीम सीमा.

कर्म + ज्ञान + भक्ती = पुरुषोत्तम योग जसे वजन + आकार + गोडी = बर्फीचा तुकडा होतो.

यात या तिन्ही मिळून बर्फीचा अनुभव घेता येतो. नुसतं वजन, नुसता आकार, नुसती गोडी यापैकी एक किंवा दोन गुणांनी बर्फी होऊच शकणार नाही. त्यातील एकही गोष्ट वेगळी काढता येत नाही. तसेच कर्म, ज्ञान व भक्ती या तीन गोष्टींनी 'पुरुषोत्तम योग' पूर्ण होतो, असे विनोबाजींचे सांगणे आहे. ते पुढे वर्णन करतात हा पुरुषोत्तम योग रूपी सूर्य प्रगट होण्यापूर्वी त्याची प्रभा आकाशात दिसते ती सद्गुण रूपी प्रभा ही दैवी संपत्ती व ती ज्या अंधाराशी झगडून प्रगट होते त्या अंधाराचे म्हणजे आसुरी संपत्तीचेच सविस्तर वर्णन या अध्यायात आले आहे. १ ल्या अध्यायात जसा पांडव-कौरव सेना समोरासमोर उभ्या आहेत त्याप्रमाणे या १६ व्या अध्यायात दैवी संपत्ती व आसुरी संपत्ती म्हणजेच दैवी सद्गुणांची सेना व आसुरी दुर्गुणांची सेना समोरासमोर उभ्या केल्या आहेत. प्राचीन काळापासून मानवी मनात जो सत् असत् प्रवृत्तींचा, सुष्ट दुष्ट विचारांचा झगडा चालत आलेला आहे त्याचेच हे रुपकात्मक वर्णन आहे. त्या सैन्यानेही व्यूह रचना उत्तम प्रकारे केलेली आहे. दैवी सद्गुणांचा सेनापती म्हणून उभी आहे (गुणांची वाढ

व्हायला पुढे निर्भयता हवी) मागे पिछाडीला 'नम्रता' हात जोडून उभी आहे. बेसावधपणे मागून हल्ला झालाच तर परतवायला. या दोनच्या मधे २४ गुण उभे आहेत शह द्यायला. निर्भयतेने प्रगती होत आणि नम्रतेने बचाव होतो.

आसुरी दुर्गुण हे अज्ञान आहे आणि अज्ञान हे पाप आहे. दुसऱ्याच्या अज्ञानाबद्दल क्षमा करावी. (ज्ञानेश्वरादी भावंडांना संन्याशाची पोरे म्हणून समाजाने छळले. त्यावेळी त्यांनी त्या अज्ञानी लोकांना क्षमा कर म्हणून देवाला विनवले. तसेच येशू ख्रिस्ताला सूळावर खिळे ठोकून लटकवले त्यावेळी त्या खिळे ठोकणाऱ्या अज्ञानी लोकाना क्षमा कर असेच त्याने प्रभूला विनवले.) परंतु स्वत:च्या अज्ञानाला क्षमा करणे पाप आहे, असे भगवंत म्हणतात.

दैवी संपत्तीचा विकास करायचा व आसुरी पासून दूर रहायचे. तू अहम्‌भावावर स्थिर राहू नकोस आत्मभावावर स्थिर रहा. तू या जगाचे जडरुप पाहू नकोस तर विविध जड रूपाला ओवणारी माझी परा प्रकृती पहा. जीव व जगत् यात एकच परमात्म तत्व नांदत आहे. अर्जुना मीच एकमेव असा चित्सूर्य आहे व माझीच ही विविधरूपे आहेत. (अकराव्यात चित् सूर्याचा साक्षात्कारही परमेश्वराने घडवलेला आहे.) विश्वरूपाच्या महाप्रलयात आपले स्वरुप रूपांतर करून जीवन संपविण्याचे कारण नाही. तर संपूर्ण विश्व जीवन एकात्म आहे हे ध्यानात घेऊन जीवनाची उभारणी केली म्हणजे झाले.

परमात्म तत्त्वाशी भावात्मक तादात्म्य पावणे हीच भक्ती किंवा हाच योग साधला की मग काहीच सांगायचे शिल्लक राहत नाही अशी आत्मानुभूती पावलेली व्यक्ती ओळखण्यासाठी - कोणते दैवी गुण तिच्यात दिसले पाहिजेत ! व आत्मानुभूती न जाणणारे लोक जे जगताचे स्थूलरूपच खरे समजतात व त्याच्या पलिकडे जाण्याची व ते परमात्म तत्त्व जाणण्याची त्यांना आवश्यकताच वाटत नाही त्या आसुरी लोकांचे जीवन कसे असते. त्या लोकात कोणत्या गुणांची कमतरता असते हे जाणून घेण्यासाठी हा सोळावा अध्याय सांगितला आहे. म्हणजेच दैवी संपत्तीचे लोक कोणत्या गुणांनी युक्त असतात व आसुरी संपत्तीचे लोक कसे असतात त्यांना प्रकृतीची मोहिनी कशी पडते व मग त्यांचे ज्ञान, आशा, कर्म कसे व्यर्थ जातात याचे स्पष्टीकरण जे नवव्यात सुरुवात करूनही सांगायचे राहून गेले या अध्यायात केले आहे.

या सृष्टीतील प्रत्येक वस्तू चैतन्य सूत्रात ओवलेली आहे म्हणून जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना परमेश्वराचे अधिष्ठान पाहिजे. रामदास स्वामींनी म्हटलेलेच आहे की ''सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे ॥''

परमात्मतत्वाचे अधिष्ठान जरूर हवे पण त्या परमात्मतत्वाला आवाहन मात्र कोणी करू नये. त्याचे प्रगट होणे म्हणजे जगाचा विनाश. म्हणून या स्थूल सृष्टीच्या विविधतेने त्याच्या सौम्य रूपाची अनुभूती घ्यावी. हा मार्ग भगवंतानेच पंधराव्या अध्यायात पुरुषोत्तम योग सांगून सांगितला आहे. 'अनंत वेषे अनंत रुपे देखिला म्या त्यासी' अशी ज्ञानेश्वरांसारखी अनुभूती सर्वांनी घ्यावी. सर्वत्र एकमेव चैतन्य भरून आहे. माझ्यातही तेच आहे. मी ब्रह्मरुप आहे 'अहं ब्रह्मास्मि या आत्मभावनेने, अनुभवाने ही समदृष्टी-समग्रता अनुभवणे म्हणजेच भगवंताचे सौम्य रुप पाहणे. या स्वरूपात ईश्वराची साक्षात् अनुभूती घेऊ शकते. बुद्धीपेक्षा भावनेत हे सामर्थ्य आहे. आत्म्याची किंवा परमात्म्याची अनुभूती भक्तीभावाने येते. यालाच अनन्य भक्ती म्हणतात.

आपल्यातील आत्मा जेव्हा चराचर विश्वातील आत्मा पाहतो त्यावेळी त्याच्यामध्ये तादात्म्याच्या भावनेने जो आत्मिक भावप्रवाह सुरू होतो तीच भक्ती. आत्म्याची रसात्मक अनुभूती म्हणजेच भक्ती. हा अनुभव त्या गुणांमधून व्यक्त होतो त्या गुणांना दैवी संपत्ती म्हणतात.

मोक्षाची अचूक प्राप्ती करून देणाऱ्या दैवी संपत्तीच्या २५ गुणांचे वर्णन भगवंत प्रथम करतात. निर्भयता, पूर्ण सात्विक वृत्ती, ज्ञान व कर्मयोग या दोहोविषयी तत्परता, दान इंद्रियनिग्रह, यज्ञ, स्वधर्माप्रमाणे आचार, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, अक्रोध, शांती मनात दुष्टबुद्धी नसणे, प्राणीमात्राविषयी दया, निर्लोभता, त्याग, निरासक्ती, तेज, क्षमा, अद्रोह, धृती, शुचिर्भूतपणा, लज्जा, निराभिमान, नम्रता असे हे सद्गुण दैवी संपत्ती घेऊन जन्माला आलेल्या पुरुषांना प्राप्त होतात. त्यांच्या मुखावर सदोदित चंद्राप्रमाणे तेज व शांती विलसत असते. ज्ञानेश्वरांनी या प्रत्येक गुणाचे सविस्तर विवेचन ज्ञानेश्वरीत केले आहे.

या दैवी संपत्तीच्या अगदी विरुद्ध व सर्व दोषांनी युक्त असणारी आसुरी संपत्ती. तिचे सविस्तर वर्णन भगवंत या अध्यायात करतात. खरं तर दैवी संपत्ती सांगितल्यावर आसुरी संपत्ती सांगण्याचे कारण नव्हते. याविरूद्ध ती आसुरी संपत्ती असे म्हणता आले असते. पण दोहोतील फरक बरोबर कळला नाही तर घोटाळा होण्याचा संभव आहे तो व्हायला नको म्हणनू भगवंतानी नरकाला नेणारी बंधकारक अशा आसुरी संपत्तीचे ही वर्णन केले आहे. भगवंत म्हणतात, अर्जुना तू दैवी संपत्ती घेऊन जन्मलेला आहेस म्हणून तू शोक सोडून दे. या लोकी दैवी व आसुरी असे दोन प्रकारचे प्राणी जन्माला येतात. त्यातल्या दैवी प्रकाराचे वर्णन मी पूर्वी बऱ्याच वेळा विस्ताराने केलेले आहे म्हणून आता आसुरी संपत्तीचे वर्णन माझकडून ऐक. आसुरी संपत्ती घेऊन जन्मलेल्या लोकांच्या अंगी दांभिकपणा, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरपणा आणि अज्ञान हे सहा दुर्गुण आढळून येतात.

दैवी संपत्तीत प्रकृती आत्म्याच्या स्वाधीन असते. आसुरांमध्ये प्रकृती स्वत:च मोहिनी, स्वामिनी बनते व ती आत्म्यावर अधिकार गाजवते. या संदर्भात दुसऱ्या अध्यायात आपण राजा शिपाई आणि चोर व शिपाई यांचे उदाहरण पाहिलेले आहे. आसुरी आत्म्याला आपला दास बनवते त्याला मोहात पाडते. दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरपणा व अज्ञान यातून प्रकृतीचे स्वामित्व प्रत्ययाला येते.

**दंभ** - आपण केलेला दानधर्म स्वत:च सर्वांना सांगत सुटणे. (अहंकारी) स्वत:च्या मोठेपणासाठी हा ढोंगीपणाने दैवी संपत्तीच्या वेषातही वावरतो. तो दानधर्म करतो, तप आचरतो, गोड बोलतो, दया दाखवतो, नम्र होतो पण हे सर्व इतरांचा आत्मा संतुष्ट व्हावा म्हणून नाही. परमेश्वराची पूजा म्हणून ही नाही तर स्वत:च्या नावलौकिक वाढावा म्हणून हा मार्ग आचरतो. यात प्रेम, जिव्हाळा नावालाही नसतो. अशांना ईश्वराचा साक्षात्कार होत नाही व विश्वाच्या एकात्मतेची अनुभूतीही येत नाही.

**दर्प** - कीर्ती, धन, विद्या, सत्ता या भौतिक संपदेने हे लोक माजतात. यातील एखादी गोष्ट अल्पप्रमाणात मिळाली तरी दर्प चढतो. त्यांना मग सर्वच मिळाल्या तर बघायलाच नको. दुसऱ्यांना कमी लेखणे, त्यांच्यावर अन्याय करणे हे दर्प दुर्गुणातच मोडतात.

**अभिमान** - यांना 'मी'चा अभिमान, गर्व असतो, 'मी' श्रेष्ठ, माझंच बरोबर, हे मी केलं ते मी केलं. मी कसा इतरांपेक्षा वेगळा आहे वगैरे लोकांना पटवून देण्याचा हे लोक इतका प्रयत्न करतात की ते सर्वांना नकोसे होतात.

**क्रोध** - दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणे, जळफळणे, मत्सर करणे.

**निष्ठुरपणा** - दगडाप्रमाणे पाझर न फुटणारे अंत:करणाचे, कठोर हृदयी.

**अज्ञान** - विधी निषेध व पाप पुण्यातील फरक न जाणणारे. जग हे त्यांच्यासाठी आहे पण ते जगासाठी नाहीत. जगाचे कुणी लागत नाहीत.

आपले जीवन स्थलकाळात वावरते ते आकारात व जडतेत बद्ध असते. या साऱ्या बंधनातून दैवी संपत्ती

मुक्त करते. तर आसुरी बंधनात टाकते. दैवी स्वभावाचे लोक अंतर्मुख तर आसुरी स्वभावाचे लोक बहिर्मुखी असतात. पूर्वी बाराव्यात मी भक्ताची लक्षणे, तेराव्यात ज्ञानी पुरुषाची लक्षणे व चौदाव्यात गुणातीताची लक्षणे या परिभाषेत दैवी संपत्तीचेच वर्णन केलेले आहे. आसुरी संपत्तीचे सहाच गुण असले तरी सव्वीस गुणांना भारी आहेत. त्यांचा पराक्रम फार मोठा आहे. जीवाचा सर्वनाश करून त्याला नरकात पोचवण्याची ताकद त्यांच्यात आहे. पुढे आसुरीचे आणखी वर्णन करून तिच्या दोषांतून सुटण्याचा उपायही भगवंत सांगत आहेत.

आसुरींची प्रवृत्ती नित्य पापकर्माकडेच असते. पुण्यकर्म करावे असे त्यांना वाटतच नाही. हे विश्व चालवणारा ईश्वर आहे, असे मानायला ते अजिबात तयार नसतात. ईश्वराचा ते तिरस्कार करतात. जगाच्या उत्पत्ती-स्थिती-लयाला 'काम'च कारणीभूत आहे असेच ते मानतात. स्त्री सुखाची त्यांना हाव असते. त्यासाठी आवश्यक पैसा ते कुठल्याही मार्गाने मिळवतात. मारामाऱ्या, खून करायलाही ते कमी करत नाहीत. तरी ही विषयाची हाव संपतच नाही. हाव वाढतच जाते. जगातील सर्व संपत्तीचा मीच मालक होईन. मग मी वाटेल ते भक्षण करीन, अपेयपान करीन. 'स्व'च्या सुखासाठी त्याने बुद्धी व कल्पकता वापरून नाना खाद्य पदार्थ व पेय प्रकार बनवले. ज्ञान आहे म्हणून तो पशू म्हणता येणार नाही. पण त्याच्या बुद्धीने मानवी हिताचा विचारच केला नाही. फक्त पैसा आणि पैसा मिळवायचा हाच विचार मग संस्कृती गेली खड्ड्यात. समाजाला व्यसनाधीन, व्यभिचारी बनवून रसातळाला नेण्याकडेच त्याची प्रवृत्ती. पशूंना ज्ञान नसले तरी ते निसर्ग बंधने पाळतात पण माणूस पशूहूनही पशू झालाय. पापाचा पैसा मिळवल्याची खंत नाही की व्यभिचारी वृत्तीची लाज नाही. कर्मातील पावित्र्य आज नष्ट झालंय. आपण एकट्यानेच सर्व भोगावे म्हणून ते जारण मारण विद्याही अवलंबितात. तर कधी महंतपणाचा आव आणून यज्ञही करतात. पण तो वरवरचा देखावा असतो. त्यात पूज्य भावना, श्रद्धा, निष्ठा काहीच नसते.

हे जग ईश्वराने निर्माण केलेय असे. ते मानीत नाहीत मग ईश्वराला कोणी निर्माण केलेय? असा प्रती प्रश्न ते विचारतील. जग स्त्री-पुरुष यांच्या संयोगातून निर्माण झालंय. त्यामुळे जीवन हे उपभोगासाठीच आहे हे त्यांचे मत आहे. आपल्या बुद्धीने त्याने उपभोगाचे नवे नवे विषय व त्यांचे प्रकार शोधून काढले. पशूपेक्षा त्याचे जीवन भोगसमृद्ध आहे. उच्चभ्रु समाजाच्या नावाखाली वासनांचा नंगा-नाच चाललेला आहे. मानवातील पशुत्वाने थैमान घातले आहे. पण प्रकृती मोहिनी होऊन 'एडस्'च्या रूपाने नाचता-नाचता त्यांचाच हात डोक्यावर ठेवणार आहे व भस्म करणार आहे. हा नंगानाच ती तरी कुठवर सहन करील! प्राचीन ययातीची सुखोपभोगाची कल्पना स्त्री सुखापुरती मर्यादित होती. पण आजच्या आधुनिक ययातींना प्रत्येक इंद्रियाची अमाप सुखे आकर्षित करीत आहेत. त्यामुळे देहापलिकडचा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही. अर्थ व काम या दोन पुरुषार्थासाठी दोन राष्ट्रातही संघर्ष व युद्धे होतात. राष्ट्रे धनसंपन्न व सामर्थ्यसंपन्न होतातही. पण उपभोगापलिकडे त्यांच्या बुद्धीची मजल मुळीच नसल्यामुळे असे अज्ञानी नरकात जातात.

बढाईखोर, स्वार्थी, गर्विष्ठ, सत्ता संपत्तीने मदोन्मत्त झालेले, ईश्वरद्रोही, सत्पुरुषांना पीडा देणारे क्रूरकर्मा, घातक अशा नराधमांची मनुष्यपणाची पदवी काढून घेऊन क्लेश व दुःखानी परिपूर्ण अशा रौरव नरकात मी त्यांना कोट्यावधी वर्षे टाकून देतो. हे कुंतीपुत्रा असे हे जन्मोजन्मी आसुरी कोटीला प्राप्त झालेले मूर्ख लोक माझी प्राप्ती कधीच न होता अखेरीला अधोगतीला जातात. ज्या घोर यम यातना आसुरी संपत्तीच्या लोकांना भोगाव्या लागतात त्याचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांच्या अंगावर शहारे येऊन त्यांची वाणी रडकुंडीला आलेली दिसते व हे लोक असे का बरे वागतात? असे निराळेच पण कळवळ्याचे उद्गार त्यांच्या मुखातून

निघतात. (१६.४१७ ते ४२४)

म्हणूनी मर्यादा लाविली देवे । नीती न्याये वर्तावे

नाहीतर लागती भोगावे । यमयातना ॥ असे रामदास स्वामी यांनीही दासबोधात म्हटले आहे. अध्यायाच्या अखेरीला भगवंत सर्व मानवजातीला सांगतात की काम, क्रोध व लोभ जेथे आहेत तिथे पाप, नरक, यातना ठेवलेल्याच आहेत.

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मन: ।

काम: क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्रयं त्यजेत् ॥ १६.२१

काम, क्रोध व लोभ ही ती नरकाची - आत्मघातक अशी तीन द्वारं आहेत म्हणून या तिहींचा त्याग करावा. त्यापासून दूर रहावे.

या पृथ्वीवरच स्वर्गही आहे व नरकही आहे. आपणच तो आपल्या कर्मांनी निर्माण करतो. काम-क्रोध-लोभ ही नरकाची तीन महाद्वारे आहेत. त्यातून माणसे नरकात प्रवेश करतात. भगवंताने सर्व मानवांना हा धोक्याचा कंदिल दाखवून सावधानतेचा इशारा दिलला आहे.

प्रथम लागतं ते 'कामाचं' द्वार. मानवाच्या या काम विकाराने पशूची पातळी गाठली आहे. त्यामुळे कुटुंब व्यवस्था कोसळली आहे. अनाथालये वाढली आहेत. विवाहपूर्व व विवाह बाह्य संबंध आजकाल दूरदर्शनद्वारा घराघरातून पोराबाळांच्या मनावर दुष्परिणाम करीत आहेत. चित्रपट परवडला, तो जाऊन पहावा लागतो. वाईट असेल तर नाही पाहिला गेलं पण आता तोही घरात आला आभाळच फाटलं तर ठिगळ कुठे लावणार ! मुळापासून काय काय लपवणार, दूर ठेवणार हा प्रश्न आहे.

पती-पत्नीच्या नात्यातील पावित्र्यच आज नष्ट झालेय. उरलीय ती स्त्री-पुरुष (नर-मादी) ही पशूंची पातळी. एकान्ताचे पावित्र्य जाऊन आता राजरोस खुल्लमखुल्ला उघडानागडा बाजार झालाय स्त्री-पुरुष संबंधाचा. व्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैर वर्तन बोकाळलाय. वासना व व्यसने समाजाला 'एडस्'सारखे किळसवाणे रोग देऊन पोखरत आहेत. कामाचे सताड उघडे दार मानवाला थेट नरकातच नेणारे आहे.

दुसरं लागत ते 'क्रोधाचे' द्वार. काम शमला नाही त्यात अडथळा आला तर उघडते क्रोधाचे द्वार. काम द्वार उघडले नाही क्रोधाच्या द्वारातून सहज प्रवेश होतो. कामाची तीव्रता क्रोधाग्नि भडकवते. मग बलात्कार घडतात, खून पडतात.

तिसरं लागत ते 'लोभाचे' द्वार. काम शमला तर आणखी लोभ वाढतो व तिसरे नरकाचे द्वार पटकन उघडले जाते व त्यातून नरकात प्रवेश होतो. 'स्त्री' लोभ, 'धन' लोभ, 'सत्ता' लोभ यामुळे इतिहासात अनेक युद्ध झालीत त्याच्याबद्दल नरक यातना प्रजेने भोगल्यात. लोभाची तृप्ती होतच नाही. कितीही मिळाले तरी अजून हवे. एक गाडी पुरत नाही चार हव्यात. दहा साड्या असल्यातरी कपाटभर हव्यात. एक घर असलं तर चार-पाच बंगल्याची हाव सुटते. मग त्यासाठी मारामाऱ्या, लाच, भ्रष्टाचार शिगेला पोचतो. त्यामुळे मग राष्ट्रीय संपत्तीचा दुरुपयोग होतो. माणुस स्वत:चा सर्वनाश करतो व समाजालाही अध:पतित करतो. यामुळे देशही पारतंत्र्यात जातो. स्वैर वर्तनामुळे नरकाच्या काम, क्रोध, लोभ ह्या द्वारातून तो थेट नरकातच पोचतो, या पृथ्वीवरच तो नरक निर्माण करतो.

ह्या नरकापासून मुक्त होण्यासाठी देहइंद्रिये-मन-बुद्धी यापलिकडे असणाऱ्या आत्म्याचा अनुभव यायला हवा. त्यासाठी स्वत:त असलेला आत्मा व इतरांमधला परमात्मा ओळखता यायला हवा. चराचरातील एकात्मता असलेल्या परतत्त्वाचा जीवनाला स्पर्श व्हायला हवा. विश्वातील एकात्मता दर्शवणारे परमतत्व आहे. हा सर्वश्रेष्ठ

शास्त्र सिद्धान्त आहे. जीवनाला त्या शास्त्राचा आधार असणे गरजेचे आहे. हे साधल्यास मनुष्य श्रेष्ठ गतीला जातो. जो शास्त्राला सोडून मनसोक्त वर्तन करतो त्याला सिद्धी, सुख, परमगती प्राप्त होत नाहीत म्हणून अर्जुना कर्तव्य व अकर्तव्य कोणते याचा निर्णय घेतेवेळी तुला शास्त्र प्रामाण्य मानलेच पाहिजे. शास्त्राप्रमाणे काय उचित आहे काय अनुचित आहे हे जाणूनच कर्म करणे तुला या लोकी योग्य आहे. तुझ्यावर लोकसंग्रहाच्या दृष्टीने फार मोठी जबाबदारी आहे कारण तू करशील तेच प्रमाण मानून लोक वागणार आहेत. तुझाच आदर्श ठेवणार आहेत. 'महाजनो येन गत: समार्गा: ।'

माणसाला आपले कल्याण व्हावे असे खरेच वाटत असेल तर त्याने काम-क्रोध-लोभ यांची संगत सोडावी व मोक्ष मार्गाचे पांथस्थ अशा साधू सज्जनांची साथ संगत करून शास्त्रश्रवण करावे. मगच त्याला मोक्षप्राप्त होऊ शकेल. जन्म मरणाची येरझार कायमची संपेल त्याची. दु:खमुक्त होऊन नित्यानंदाचा लाभ होईल.

शास्त्र हीच धर्माची खरी कसोटी आहे. कार्य कोणते व अकार्य कोणते हे कळण्यासाठी शास्त्र प्रामाण्याचा आदरण करणे अगत्याचे आहे. नाहीतर धर्म हेकट , आग्रही, अविवेकी होईल. ज्ञानाचा शत्रू बनेल म्हणून धर्माने सत्यनिष्ठा दाखवली पाहिजे. शास्त्रे ही धर्मविरोधी असता कामा नये व धर्म हे शास्त्रविरोधी असता कामा नये. विमानाने जगाला भौतिक एकता प्रदान केलीय, शरीराने एकत्र आणलय. मनाने एकत्र येण्याचे काम ज्ञानाचे आहे. गीता जगाला मनाची, बुद्धीची, आत्म्याची एकता प्रदान करते. जे कार्य धर्माचे ते कार्य गीता करते. म्हणूनच काळाच्या झंझावातातही 'गीता' टिकून राहिली. गीता गाणारा जगाचा प्रेरक, उद्धारक आहे. त्याने आधी केले मग सांगितले.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥

अर्जुना जे काही करशील ते मला अर्पण कर. हा निष्काम कर्मयोगाचा मार्ग त्याने जगाला सांगितला. म्हणून तो महान नेता, द्रष्टा बनला. 'गीता' हेच त्याचे दर्शन. 'वाङ्मय मूर्ती श्रीहरीची. तो कमालीचा मानवतावादी होता. मानवतेला अध:पतनापासून वाचवण्याची शक्ती गीतेत आहे. पशुत्वातून मानव्य व मानव्यातून देवत्व निर्माण करण्यासाठी आत्मिक शक्ती पाहिजे. तेच कार्य गीता करतेय. गीतेच्या पानापानावर नि:स्वार्थी सेवेचा संदेश लिहिलेला आहे.

कायदा मानवतेचे रक्षण करूच शकत नाही. धर्मच मानवतेचे रक्षण करू शकतो. परार्थाच्या नावावर स्वार्थ साधला जातो. स्वार्थाच्या पोटात लपलेली पशुता दूर होईल व उच्च नैतिकता प्रगटेल तेव्हाच मानवता निर्माण होईल. श्रीकृष्णाने प्रथम पशुतेचा नाश करण्याचा पुरस्कार केला. पशुतेचा समूळ नायनाट व्हावा अशी इच्छा असेल तर गीतेचे हे तत्वज्ञान जगाला समजावून सांगा. हीच त्याची खरी भक्ती ठरेल त्यासाठी सत्वर उठा, कामाला लागा, स्वाध्याय करा, जीवनाला अधिकाधिक तेजस्वी बनवा. स्वरूपदर्शन हेच विश्वरूप दर्शनाचे उत्तम साधन आहे, असे आपल्या प्रवचनांतून प.पूज्य पांडुरंगशास्त्री आठवले नेहमी सांगतात.

मानवातील दैवी संपत्तीचा विकास व आसुरी संपत्तीचा विनाश करण्याचे कार्य हाती घेऊन म्हणुया -

सर्वेऽपि सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया: ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ॥
ॐ शान्ति: शान्ति: शान्ति:

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : २५४१०१४०

# ग्रंथविश्व

## नॅशनल बुक ट्रस्ट

पं. जवाहरलाल नेहरूंनी स्थापन केलेली ही राष्ट्रीय संस्था. नॅशनल बुक ट्रस्टतर्फे बहुविध वाचनीय साहित्य प्रकाशित केले जाते. लहान मुलांसाठी पुस्तके आणि नवसाक्षरांसाठी पुस्तकांचाही यात समावेश आहे. हिंदी, इंग्रजी, असमिया, उर्दू, उडिया, कन्नड, गुजराती, तामिळ, तेलगू, पंजाबी, मराठी, मल्याळम् अशा अकरा प्रमुख भारतीय भाषांमध्ये ही पुस्तके प्रकाशित केली जातात. कोकणी, नेपाळी, मणिपुरी या भाषांमध्येही हल्ली पुस्तके प्रकाशित केली जातात. पुस्तकांचा प्रचार-प्रसार आणि वाचनाचा विकास ही संस्थेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्यादृष्टीने देशभर पुस्तक मेळे आणि प्रदर्शनांचे आयोजन केले जाते. दरवर्षी १४ ते २० नोव्हेंबर या कालावधीत 'राष्ट्रीय ग्रंथ सप्ताह' साजरा केला जातो.

गेल्या वर्षी संस्थेने प्रकाशित केलेली काही उत्तम पुस्तके अशी

- **'सारे मिळून हसू या'** अनु. रविन्द्र किंबहुने मूल्य रु. २५/-
- **'स्वातंत्र्याचा लढा'** अनु. भा. कृ. पारधी (सर्व वयोगटांतील वाचकांसाठी व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तक) मूल्य रु. ४५/-
- **'आपल्या भारतातील साप'** अनु.मारुती चितमपल्ली (भारतातील ३० प्रातिनिधिक सर्पकुळांची सविस्तर ओळख करून देणारे पुस्तक) मूल्य रु. ४५/-
- **'आझाद हिंद फौजेची कहाणी'** अनु. म. अ. करंदीकर, मूल्य रु. ३५/-
- **'हृदयविकार आणि आपण'** अनु. जयंत एरंडे (हृदय विकाराविषयी असलेली अनाठायी भीती दूर करणारे माहितीपूर्ण पुस्तक) मूल्य. रु. २५/-
- **'आपले पर्यावरण'** अनु. रा.वि. सोवनी. मूल्य. रु. ३५/-
- **'कर्क रोग'** अनु जयंत एरंडे (मूल्य. ३५/-)

### व्यक्तिगत वाचकांसाठी आकर्षक योजना

एन.बी.टी. बुक क्लबच्या सदस्यांना २० टक्के सवलतीत पुस्तके मिळतात. आजीवन सदस्यता शुल्क रु. ५०/- फक्त. आजच पुढील पत्त्यावर संपर्क साधा - श्री. अरविंद भास्कर, विभागीय संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, महापालिका प्राथमिक उर्दू शाळेची इमारत, टँक क्रॉस लेन, जे. जे. हॉस्पिटलसमोर, मुंबई - ४०० ००९.

दूरध्वनी :९५२२-२३७२०४४२

## साहित्य अॅकाडमी

केंद्र सरकारच्या या स्वायत्त संस्थेची स्थापना १९५४ मध्ये झाली. भारतीय संविधानाच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ट व साहित्य अकादमीने मान्यता दिलेल्या २२ भारतीय भाषांत प्रत्येक वर्षी प्रकाशित झालेल्या उत्कृष्ट साहित्यकृतींना पुरस्कार दिले जातात. सर्वोत्कृष्ट ग्रंथाला २५ हजार रु. व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असते. अनुवादित साहित्यास दहा हजार रु.चा पुरस्कार दिला जातो. विविध वाङ्मय प्रकारांतील उत्कृष्ट पुस्तकांची यादी करून ती संबंधित भाषेसाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीतील सदस्यांना पाठविली जाते. या समितीकडून शिफारस करण्यात आलेल्या पुस्तकांचा विचार दहा तज्ज्ञांच्या समितीद्वारे केला जातो. या समितीद्वारे शिफारस झालेल्या पुस्तकांचा विचार तीन सदस्यांच्या समितीमार्फत होतो. त्यांनी सादर केलेल्या यादीवर साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत विचार होऊन अंतिम निवड केली जाते. संस्थेतर्फे 'समकालीन भारतीय साहित्य' व 'Indian Literature' ही द्वैमासिके प्रकाशित केली जातात. बावीस भाषांमधून पुस्तके प्रकाशित करणारी ही जगातील एकमेव संस्था आहे. संस्थेच्या विभागीय कार्यालयाचा पत्ता असा -

श्री. प्रकाश भातंब्रेकर, विभागीय सचिव, साहित्य अकादमी, प्रादेशिक कार्यालय, १७२ शारदा सिनेमा

बिल्डिंग, दादर (पू.), मुंबई - ४०० ०१४. (दूरध्वनी : ९५२२-२४१३५७४४)

## 'नीहार'चे (ले. विलास चाफेकर) प्रकाशन

पुण्याच्या जाणीव संघटना आणि वंचित विकास, (४०५/१, नारायण पेठ, पुणे-४११०३०) यांनी १०/४/२००३ रोजी आयोजित केलेल्या एका समारंभात सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते विलास चाफेकर यांच्या 'निहार' या अप्रतिम पुस्तकाचे (पृ. ८० मूल्य रु. ५६/-) प्रकाशन केले. याप्रसंगी प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. श्यामला वनारसे, मनोहर परळकर यांची समयोचित भाषणे झाली.

## विलास चाफेकर

गेली ३०/३५ वर्षे समाजपरिवर्तनाचे कार्य मोठ्या निष्ठेने, जिद्दीने करणाऱ्या विलास चाफेकर (क्यू ३४, इंद्रनगरी, डाहणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०२९) हे एक मनस्वी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या सहकाऱ्यांनी, त्यांचा अत्यंत समर्पक शब्दात करून दिलेला परिचय असा -

'ओघळत मातीमोल होऊ पाहणाऱ्या दवबिंदूंना अलगद ओंजळीत पकडण्याचे कसब शिकविणारे, समाजातील प्रत्येक विषमतेच्या विरोधात ठाम भूमिका मांडायला शिकविणारे, अतिशय संवेदनशील, नवनिर्मितीचा ध्यास असलेले, पुरोगामी विचारसरणीचे विचारवंत, परिवर्तनावर दृढ विश्वास जाणीव व वंचित विकासाचे संघटक, 'संस्थापक' श्री विलास चाफेकर (सर...)

'नीहार' पुस्तकाच्या मनोगतात विलास चाफेकर म्हणतात, 'या समाधानाच्या क्षणी आठवण येतेय त्यांची, ज्यांनी परिस्थितीमुळे अगतिक होऊन खिडकीच्या चौकटीत बाजार मांडलाय, स्वतः सजवलेल्या देहाचा त्या मातांची आठवण सदोदितच ताजी आहे, त्यांना मुक्त होण्यासाठी संधी मिळवून द्यायचीय कधीतरी... केव्हातरी... ते खूप लांबच स्वप्न.. तोपर्यंत त्यांची आठवण मनात ताजीच राहील.'

महादेवी वर्मांचं एक हिंदी खंडकाव्य आहे. 'नीहार' शब्द संस्कृतातला पण फार छान भावला. आवडला. त्याचा अर्थ आहे दवबिंदू, हिंदीत ओसकण. वेश्यांची मुलं. खरतर इतरांसारखीच ही मुलं. पण उपेक्षित. त्यांच्या आयांसारखीच. त्यांना जगण्याची, फुलण्याची संधी हवी. दवाचा एक थेंब कमळाच्या पानावर पडला तर मोती बनतो. पानाचा आधार नसला तर मातीत मुरून जातो. ही मुलं त्या दवबिंदूंसारखीच. एखाद्या संस्थेचा आधार मिळाला तर मोत्यासारखी चमकतील, नाहीतर मातीत पडून माती बनतील.

## वंचित विकास

तर असे हे विलक्षण ध्येयवेडे विलास चाफेकर त्यांनी २६.१.१९८२ रोजी जाणीव संघटना स्थापन केली. मागास समाज घटकांत ही संस्था काम करीत आहे. विकास कसा साधता येईल, त्याचे आदर्श प्रयोग करण्यासाठी 'जाणीव'नेच १९८५ मध्ये 'वंचित विकास' या न्यासाची स्थापना केली. महाराष्ट्र व मध्यप्रदेश हे वंचित विकासाचे कार्यक्षेत्र आहे. स्त्रिया व मुले, शेतकरी व शेतमजूर, दलित, आदिवासी भटके विमुक्त व शहरी गरीब हेच ते वंचित समाजघटक. त्यांच्या विकासासाठी वंचित विकास काम करीत आहे. 'नीहार'च्या कामाबरोबरच दवाखाना व सल्ला मार्गदर्शन केंद्र, सबला हिला केंद्र (पुणे व लातूर), बालकामगार (पुणे), गोसावी वस्ती विकास प्रकल्प - विज्ञान तंत्रज्ञान केंद्र (पुणे) इ. सुमारे वीस प्रकल्प संस्था राबवित आहे. समाज परिवर्तनाच्या या कामात उदार मनाने देणग्या द्याव्यात. (वंचित विकास या नावाने धनादेश काढावेत.)

प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्याने 'वंचित विकास' या कार्यापासून प्रेरणा घ्यावी. 'नीहार' पुस्तकाच्या वाचनाने त्यांच्या जीवनात क्रांतिकारक बदल होऊ शकेल. 'वंचित विकास'च्या विविध प्रकल्पांना सहाय्य करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

## डॉ. सदाशिव गजानन देव (पणजी) यांचा अभिमानास्पद ग्रंथ

## कोश वाङ्मय : विचार आणि व्यवहार

कोशकार डॉ. सदाशिव गजानन देव (१२, प्रेसी बिल्डिंग, मळा, पणजी, गोवा-४०३००१) हे एक उच्च गणितज्ञ. गणित या विषयावरचे त्यांचे इंग्रजी भाषेत ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत. वाचनाची त्यांना लहानपणापासूनच आवड होती. महाविद्यालयीन विद्यार्थी जीवनात त्यांना लघुकथा या वाङ्मयप्रकाराची ओढ लागली. (विशेषत: गंगाधर गाडगीळ व जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांनी त्यांना झपाटून टाकले.) याच सुमारास त्यांना परदेशात नोकरी मिळाली. परंतु आपण मराठी वाचनाला मुकणार म्हणून दोन वर्षांत ते भारतात परतले.

**प्रेरणा** - थोर साहित्यिक कृ. पा. कुलकर्णी यांचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. त्यांच्याशी बोलत राहणे हा त्यांना सुखद अनुभव वाटला. शब्दांना इतिहास असतो हे त्यांचा व्युत्पत्तीकोश पाहिल्यावर त्यांच्या लक्षात आले आणि मग अशा प्रकारच्या पुस्तकांचे वाचन करण्याचा व्यासंग सुरू झाला. कोशनिर्मितीचा इतिहास ग्रंथनिर्मितीच्या इतिहासाएवढाच दीर्घ असतो. अमेरिकेत दरवर्षी १८०० कोश प्रसिद्ध होतात. कोशवाङ्मयाला पूर्णपणे वाहिलेली ५/६ नियतकालिके तेथे आहेत. साऱ्या भारतभर फिरून त्यांनी भारतीय भाषांतील कोशवाङ्मयाचा अभ्यास केला. १९ व्या शतकाच्या शेवटी किंवा २० व्या शतकाच्या सुरवातीला बऱ्याच भारतीय भाषात ज्ञानकोश तयार झाले आहेत. अन्य प्रकारचे कोश, चरित्रकोश, शब्दकोश, सूची कोश, भौगोलिक कोश असे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत.' असे त्यांनी या ग्रंथाच्या आपल्या मनोगतात म्हटले आहे.

१९९० ते १९९८ पर्यंत ते कविवर्य बा.भा.बोरकर यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या 'विश्वचरित्रकोश' या गोव्यातील संस्थेचे ते अध्यक्ष होते व कोकणी कोश निर्माण तयार करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. बा. भ. बोरकरांचे जावई श्रीराम पांडुरंग कामत यांनी एक हाती पूर्ण करीत आणलेल्या या कोशाच्या दुसऱ्या खंडाचे प्रकाशन नुकतेच गुढीपाडव्याच्या सुमुहूर्तावर गोव्याच्या कला अकादमीमध्ये झाले. १९७७मध्ये स्थापन झालेल्या या विश्वचरित्र संशोधन केंद्राचे ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर हे अध्यक्ष आहेत. दुसऱ्या खंडात जगभरातील दोन हजार चरित्रात्मक नोंदी आहेत. या प्रकल्पाचे एकूण सहा खंड असून सातवा सूची खंड असेल.

**कोशवाङ्मय : विचार आणि व्यवहार**

राज्य मराठी विकास संस्थेने (एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४००००१. दूरध्वनी : ९५२२-२२६५३१६६). गेल्या ५ वर्षांत जे कार्य केले त्यामुळे आपल्या या कामाला गती मिळाली असे डॉ. देव यांनी मनोगतात नमूद केले आहे. ४४७ पृष्ठांच्या या अभिमानास्पद ग्रंथाची ९ प्रकरणे ('कोशवाङ्मयाची भूमिका', 'विश्वकोश', 'चरित्रकोश', 'शब्दकोश', 'सूचीकोश', 'अन्य प्रकारचे संदर्भ साहित्य', 'इलेक्ट्रॉनिक माध्यमे', 'मराठी भाषेतील कोशकार्याची ओळख', 'अन्य भारतीय भाषांतील कोश वाङ्मय') 'संदर्भ साहित्य' (इंग्रजी व मराठी), 'शब्दसूची व नामसूची' (इंग्रजी व मराठी) यांचा समावेश आहे.

शेवटी आपल्या 'समालोचनात' ते म्हणतात, 'सर्व भारतीय भाषांच्या काही समान गरजा आहेत. कोशनिर्मितीसाठी सुरू केल्यास स्थानिक सर्व थोर व्यक्तींची छायाचित्रे, सर्व प्रकारचे नकाशे, तसे मागविता येतील. कोशनिर्मितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे अधिक सकस कोशवाङ्मय निर्माण होईल. कोश वाङ्मयाचे प्रकाशन वाढविणे, त्यांची ओळख समाजातील सर्व पातळीवर करून देणे ते विकण्याची व खरेदीची व्यवस्था करणे, शिक्षणसंस्थात त्यांची उपयोगिता वाढवणे यासाठी संपर्क व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय पातळीवर निर्माण केलेली संघटना व राष्ट्रीय कोशनिर्माण संस्था या देशात कार्यान्वित झाल्या तर देशातील संदर्भ वाङ्मयाचे प्रश्न मार्गी लागतील व नवीन शिक्षणपद्धतीत कोशग्रंथांचा समावेश केला तर अनेक प्रकल्प शाळा-कॉलेजातून निर्माण करता येतील. नवीन शतकाचे हे आव्हान आपण स्वीकारू शकू असा विश्वास वाटतो.'

(पान क्र. २२ वर)

# कायझेन

आपणास ठाऊक आहे तो दररोज सकाळी आपली झोपमोड करणारा सूर्य. प्रतिदिनी रात्रीचा विश्रांतीमय वेळ संपून कामाची वेळ सुरू झाली सांगणारा सूर्य. परंतु जपानमध्ये १९४५ साली हिरोशिमावर सूर्याहूनही अधिक प्रखर व तेजस्वी असा दुसरा सूर्य अणुबॉम्बच्या रुपाने उगवला. त्याने मात्र मानवतेच्या सर्व संकल्पनांसमोरचा काळोख अधिक दाट, मिट्ट करून टाकला.

परंतु जपानी माणसानी या दुसऱ्या सूर्याकडे संकट वा समस्या म्हणून न पाहता एक संधी म्हणून पाहिले. काळवंडून टाकणाऱ्या अणुबॉम्बच्या रुपातील सूर्यावर मात केली ती 'कायझेन' नामक जगद्‌विख्यात गुणवत्ता व्यवस्थापन तंत्ररुपी दुसऱ्या सूर्याने.

आता पुन्हा एकदा जागतिकीकरणाच्या होणाऱ्या स्पर्धेच्या रुपाने सर्वांना होरपळून काढणारा 'दुसरा' सूर्य उगविला आहे. त्याला समर्थपणे सामोरे जायचे असेल तर 'कायझेन' नावाची 'सूर्य' प्रणाली आत्मसात केली पाहिजे. हा संदेश देणारे हे पुस्तक.

मानव संसाधन विकास अशा क्लिष्ट संकल्पनात्मक विभागामध्ये मोडणाऱ्या या पुस्तकामध्ये केवळ लेखन नाही तर संवाद आहे - प्रश्नोत्तरे आहेत. स्वत:च स्वत:ला ओळखायचे अनेक मार्ग आहेत.

खरंतर 'कायझेन' म्हणजे शुद्ध मराठीमध्ये उत्क्रांती. मेंदू नसलेल्या एकपेशीय प्राण्याने देखील उत्क्रांतीमधून विविध जीवांनी नटलेली जीवसृष्टी बनविली मग या जैविक प्रक्रियेसोबत मानवाने जन्माला घातलेल्या भौतिक जगातील प्रगतीच्या व्यवस्थापनाचे विज्ञान म्हणजेच 'कायझेन' असे नक्की म्हणता येईल. पण ही 'कायझेन' व्यवस्थापन विज्ञानाची प्रक्रिया मानवी मनाच्या रसायनाशी अधिक पक्की बांधली गेली आहे. या प्रक्रियेमध्ये मनामधील विचारतरंग, उर्मी, विचारांची झेप व या क्षमतेचे गतीशील व दिशामय वहन अशा सर्व संसाधानांचा खोलवर विचार करण्यात आला आहे.

पृथ्वीप्रदक्षिणा प्रथम पूर्ण करणाऱ्या गणपतीची गोष्ट सर्वश्रुत आहे. पृथ्वी म्हणजे माता असा अर्थ लावून आपल्या मातेभोवती प्रदक्षिणा घालणारा हुशार गणपती... व्यवहारचतूर म्हणा परंतु खरच पृथ्वीप्रदक्षिणा घालणारे त्याचे बंधुराज हेच जास्त अनुभवसमृद्ध झाले असतील.

शिक्षण आणि अभ्यास् वृत्तीमुळे कामामध्ये अचानक मोठी सुधारणा करण्यापेक्षा लहानलहान बाबींमध्ये होकारात्मक बदल करून प्रक्रिया अधिक तत्पर आणि कार्यक्षम करण्यावर जपानी माणूस (आणि व्यवस्थापन प्रणाली) भर देतो म्हणूनच 'कायझेन'ही आपल्या मनोवृत्तीमध्ये बदल घडवून आणणारी प्रणाली आहे.

आपण आज काय करतो आहोत? खरंतर काहीच करत नाही आणि प्रत्येक नाकर्तेपणालाही दुसऱ्याला जबाबदार ठरवतो. 'जागतिक पातळीवर चालू असलेल्या स्पर्धेमध्ये भारत मागे आहे.' 'राजकीय, सामाजिक भ्रष्टाचाराने आपली कधीच भरभराट होणे शक्य नाही.' 'भारतीय माणूस व त्याचा दृष्टीकोन कधीच बदलणार नाही.' ही सगळी वाक्ये केवळ आपल्या अपयशावर तात्पुरती मलमपट्टी करतील. अपयशाचे यशामध्ये रुपांतर करणार नाहीत.

भारत देश क्षेत्रफळ, लोकसंख्या, विद्वत्ता, नैसर्गिक साधनसंपत्ती यामध्ये जगातील पहिल्या पाच देशात आहे परंतु उत्पादकता क्षेत्रात जगात ११६ वा आहे आणि आपणही पहिल्या पाचामध्ये जाणे अजिबात अशक्य नाही.

कायझेन म्हणजे सतत सुधारणा, निरंतर सुधारणा, कोणतीही गोष्ट आहे तशी स्विकारता ती अशीच का? याचा विचार करून सुधारणेच्या दृष्टीने त्यामध्ये बदल करणे, हा बदल केवळ कामापुरता मर्यादित नसून आपला स्वभाव त्या योग्य बनला तर या सुधारणा आपल्या व्यक्तिगत आयुष्यापर्यंत जाऊन पोहोचतात.

कायझेनमुळे सामान्य माणूस असामान्य काम करु शकतो.

या 'कायझेन'चे साधन आहे फाइव्ह एस -

सुनियोजितता

सुव्यवस्था

स्वच्छता व तपासणी

सद्व्यवहार

स्वयंशिस्त व शिक्षण

यापैकी एक किंवा अधिक गुण आपल्याकडे असतात परंतु एक किंवा अधिक गुण अजियात नसतो. या सर्व गुणांच्या समुच्चयातून विकास साधला जातो आणि यासाठी

जे नाही त्यासाठी खंत नको

प्राप्त होऊ शकते त्यासाठी प्रयत्न करा.

सर्व मार्गांनी, सर्व ठिकाणी, सर्व वेळी, सर्वांचे भले करा -

- तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल, आनंदी व्हाल.

आपल्याला चांगले वागायचे असे सर्वच उपदेश देत असतात. आपल्याला मनोमनही चांगले वागावे, चांगले रचनात्मक काही घडावे असे सतत वाटत असते. खरंतर आपल्यासारखेच इतरांनाही वाटत असते. असे अनेक एकत्र आले तर 'कायझेन' ही प्रेरणा त्यांच्याकडून असामान्य काम करवून घेऊ शकते.

म्हणून तर 'कायझेन' ही जीवनाकडे सुंदरतेने बघणाऱ्यांसाठी एक संधी आहे. फारच परदेशी नावाची 'अॅलर्जी' असेल तर त्याला काहीही भारतीय नाव द्या. अगदी कोणत्याही धर्मा-पंथाचे तत्वज्ञान अभ्यासा. 'कायझेन' हे सर्व कल्पक जीवांसाठी आदर्श तत्वज्ञान आहे. म्हणूनच अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनीही आपल्या जीवनघडणीमधील एक महत्त्वाचे पुस्तक म्हणून विकत घेऊन वारंवार वाचलयाच हवे.

प्रा. विद्याधर वालावलकर

साभार - 'पॉलिझिन २००२-२००३' वरून

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| भाषांतरित पुस्तक |
|---|
| पुस्तकाचे नाव : सूर्य दोनदा उगवला<br>कायझेन - एक जीवनप्रणाली |
| **लेखक :** शाम तळवडेकर |
| **भाषांतरकार :**<br>अॅड. चंद्रकांत भिसे / सौ. संजीवनी तळवडेकर |
| **प्रकाशक :** मॅजेस्टिक प्रकाशन |
| **मूळ पुस्तक : World of Kaizen**<br>A total quality of Culture for Survival.<br>- Shyam Talavadekar |

---

(पान क्र. २० वरून)

**ग्रंथविश्व**

सुप्रसिद्ध साहित्यिक, समिक्षक डॉ. सुधीर रसाळ यांची विवेचक प्रस्तावना या ग्रंथास लाभली आहे. ग्रंथाचे प्रकाशक सुपर्ण प्रकाशन (सौ. सुनिता इनामदार, १५५२, चिमण बाग, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०) व लेखक डॉ. सदाशिव देव यांचे अभिनंदन. विविध विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेल्या कॉलेजेसनी आपल्या ग्रंथालयात हा ग्रंथ ठेवणे आवश्यक आहे.

शरद जोशी (ग्रंथप्रसारक)

सी-५, अमर कल्पतरु को.सो.,

देवी चौक, शास्त्रीनगर, डोंबिवली (प.),

जि. ठाणे - ४२१२०२.

(फोन : ९५२५१-२४८६९६७)

# आम्ही मराठी चित्रपट का पहावा?

*मराठी चित्रपटात आता असं काय उरलय की ज्यांसाठी तो थिएटरमध्ये सहकुटुंब जाऊन पाहावा ? अनुकरणामुळे आपले अस्तित्व गमावणाऱ्या या चित्रपटाविषयी- संपादक*

खरं म्हणजे हा विषय वाचल्यावर मलाही प्रश्न पडला. 'आम्ही मराठी चित्रपट का पहावा?' अशी कोणती गोष्ट मराठी चित्रपटात आढळते जी प्रेक्षकांना आकर्षित करू शकते? मराठी चित्रपटांची आजची स्थिती पाहिली तर वर्षाकाठी हा चित्रपट काळाच्या पडद्याआड कोणतीही दखल न घेता जातात, हे आपल्या लक्षात येईल. हिंदी व मराठी चित्रपटसृष्टी एकाच दशकाच्या आसपास अस्तित्वात आलेली असताना मराठी चित्रपट आज मागे का राहतो, हे जाणून घेण्यासाठी इतिहासात डोकावण्याची गरज भासते.

६ फेब्रुवारी १९३२ रोजी मॅजेस्टिक सिनेमात 'अयोध्येचा राजा' हा पहिला बोलपट प्रदर्शित झाला. या बोलपटाचे जनक होते 'व्ही. शांताराम'. हा बोलपट जर आज पाहिला तर तो बोलपट म्हणजे पडद्यावर चित्रित केलेले एक नाटकच आहे असा भास होतो. मूकपटाचे बोलपटात रूपांतर झाल्यापासून नाटकांतील संवादांचा, गाण्यांचा व अभिनयाच्या शैलीचा प्रभाव मराठी बोलपटावर जवळपास ५० वर्षे पडलेला दिसून येतो. सुरुवातीला तर मराठी बोलपट म्हणजे पडद्यावर चित्रित केलेल्या मराठी नाटकासारखाच वाटे.



'उंबरठा' - स्मिता पाटील

बोलपट म्हणजे नाटक नव्हे हे शांतारामबापूंनी 'अग्निकंकण'मध्ये प्रथम दाखवून दिले. 'अमृतमंथन' हे नरबलीच्या रूढीविरुद्ध प्रचार करणारे चित्र तांत्रिकदृष्ट्या व कलात्मकदृष्ट्या त्यावेळच्या इतर बोलपटापेक्षा अगदीच वेगळे व स्पृहणीय होते. चित्रपट व नाटक यातील फरक या चित्रपटात प्रकर्षाने जाणवला. एका अमेरिकन नियतकालिकाने 'आता भारतात कॅमेराही बोलू लागला.' असे या चित्रपटाबद्दल म्हटले होते.

मराठीत पहिला सामाजिक बोलपट निघाला १९३५ साली. भा.वि.उर्फ मामा वरेरकर यांच्या कथेवर आधारित 'विलासी ईश्वर' हा मास्टर विनायक यांनी दिग्दर्शित केलेला पहिला सामाजिक बोलपट. १९३६ ते १९४२ हा काळ मराठी बोलपटांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्याइतका महत्त्वाचा ठरतो; कारण याच काळात बाबुराव पेंटरांनी 'सावकारी पाश' या अडाणी शेतकऱ्यांवर जुलूम करणाऱ्या सावकाराची व शेतकऱ्यावर येणाऱ्या संकटांची वास्तववादी कथा अतिशय प्रभावीपणाने मांडली होती. याच काळात विनायकरावांनी आचार्य अत्रे व वि.स.खांडेकर यांच्या

सामाजिक आशयसंपन्न कथांवर बोलपट दिग्दर्शित केले. अत्र्यांनी लिहिलेल्या पटकथा उपरोधिक, विनोदी व प्रचलित ढोंगावर विदारक प्रकाश पाडणाऱ्या होत्या; तर खांडेकरांच्या पटकथेत प्रचलित सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकला गेला होता.

याच काळात प्रभातने 'तुकाराम', 'ज्ञानेश्वर' यासारखे उत्कृष्ट संतपट निर्माण केले. एकाच चित्रपटगृहात एका वर्षाहून जास्त दिवस चालणारा 'तुकाराम' हा पहिलाच बोलपट. तसेच आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवण्यात आलेला 'तुकाराम' हा पहिला मराठी बोलपट. या चित्राला व्हेनिसच्या महोत्सवातही बहुमान मिळाला. 'कुंकू' हा प्रभातचा व शांतारामबापूंचा पहिला सामाजिक बोलपट. अन्यायाविरुद्ध बंड पुकारणाऱ्या स्त्रीची प्रमुख भूमिका असलेले हे वास्तववादी चित्र सर्व भारतात गाजले. १९४८ ते १९६० हा काळ मराठी बोलपटसृष्टीला भरभराटीचा गेला. 'अमर भूपाळी'ला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात बहुमान मिळाला तर 'श्यामची आई' ह्या साने गुरुजींच्या कथेवर आधारित, आचार्य अत्रे दिग्दर्शित बोलपटाला १९५३चा सर्वोत्कृष्ट बोलपट म्हणून राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाले.

१९६१ साली सामाजिक प्रश्न असलेल्या कुटुंब नियोजनावर गोविंद घाणेकरांनी ग. दि. माडगूळकर यांच्या 'आकाशातील फळे' या कादंबरीवर आधारलेला 'प्रपंच' हा अतिशय वास्तववादी व परिणामकारक बोलपट काढला.



'सांगत्ये ऐका' - जयराम शिलेदार

या सर्व इतिहासावरून आपल्याला नाटकांचा प्रवास चित्रपटात झाल्याचे दिसून येते. परंतु त्याही पेक्षा या चित्रपटांतून सामाजिक प्रश्न प्रकर्षाने हाताळले गेल्याचे समजते. तसेच मराठी संस्कृतीचे दर्शन आपल्याला संतपटातून घडते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर मराठी बोलपटांना भरभराटीचा काळ येईल


'ब्रह्मचारी' - मास्टर विनायक

अशी आशा होती. पण ती फोल ठरली. उलट हिंदी रंगीत चित्र व करमणूक करमुक्त मराठी रंगभूमीशी मुकाबला करणे मराठी बोलपटांना जवळजवळ अशक्य झाले. दरवर्षी १० ते १२च बोलपट निघू लागले व त्यात तमाशा, दारू यावरच प्रामुख्याने भर दिला जाऊ लागला. कारण मराठी बोलपट बघणारा प्रेक्षकवर्ग प्रामुख्याने ग्रामीण व शहरातील कामगार वर्ग होता. शहरी सुशिक्षित मराठी प्रेक्षक मराठी बोलपट बघण्यापेक्षा हिंदी बोलपट व मराठी नाटक पहाणेच पसंद करत असत.

या परिस्थितीवर मात करण्यासाठी व मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने करपरतीची योजना अंमलात आणली. या योजनेनंतर पुन्हा एकदा मराठी बोलपटात सामाजिक आशय असलेले वेगवेगळे प्रक्षोभक विषय हाताळले जाऊ लागले. या नवयुगातच डॉ. जब्बार पटेल व रामदास फुटाणे यांचा 'सामना' सारखा, भ्रष्टाचारी पुढारी व त्याचा आत्मा यातील संघर्ष दाखवणारा उत्कृष्ट चित्रपट मराठीत निघू शकला. या बोलपटाने भारतातच नव्हे तर बर्लिनच्या आंतरराष्ट्रीय महोत्सवातही प्रशंसा मिळवली. त्यानंतर जब्बार पटेल यांनी 'जैत रे जैत' व 'सिंहासन' असे आशयसंपन्न सामाजिक बोलपट काढले. 'सिंहासन' तर प्रचलित राजकीय घडामोडींवर विशेषत: सत्तास्पर्धेवर प्रकाश पाडणारा एकमेव चित्रपट. तो 'किस्सा कुर्सीका' किंवा 'मेरी आवाज सुनो' या हिंदी चित्रपटांपेक्षा कितीतरी जास्त वास्तववादी व परिणामकारक ठरला. सेन्सारने 'सिंहासन'ला परवानगी दिली इतकेच नव्हे तर भारत व महाराष्ट्र सरकारने पारितोषिक देऊन तो गौरवला.

परंतु १९८५ नंतर आलेली विनोदाची लाट मराठी चित्रपट सृष्टीसाठी मारक ठरली. पडद्यावरील नटांचे अचकट विचकट अभिनय व पानचट विनोद यामुळे मराठी चित्रपट प्रेक्षकांची मर्जी जिंकण्यात असफल ठरले. तसेच हिंदी चित्रपटांची हुबेहुब नक्कल यामुळे मराठी चित्रपट पाहणारा प्रेक्षक वर्ग घटला. प्रेक्षक वर्ग कमी म्हणून कमी खर्चात चित्रपट, कमी खर्चात चित्रपट म्हणून कुशल तंत्रज्ञानाचा अभाव, कथेची-अभिनयाची भ्रष्ट नक्कल, एकूणच चित्रपटांचा दर्जा कमी आणि दर्जा कमी म्हणून प्रेक्षकांची संख्या कमी अशा दुष्टचक्रात मराठी चित्रपट अडकला.

'या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सरकार आमच्यासाठी काहीच करत नाही' ही तक्रार झाल्यावर युती

सरकारने तिजोरीच्या चाव्याच चित्रपट निर्मात्यांच्या हाती दिल्या. प्रत्येक मराठी चित्रपटासाठी सोळा लाख रूपये, करमाफी आणि त्याचप्रमाणे चित्रनगरीत चित्रिकरणासाठी पन्नास टक्के सवलत एवढ्या सुविधा दिल्या. तरीसुद्धा या चार वर्षांमध्ये एखादा अपवाद सोडल्यास एकही नाव घेण्यासारखा चित्रपट प्रदर्शित झाला नाही. सरकारने आतापर्यंत चित्रपट अनुदानासाठी सुमारे तीन कोटी रूपये खर्च केले तरीही चांगली चित्रपट निमिती का होत नाही? मग सहाजिकच मनात असंख्य प्रश्न गर्दी करतात. आपल्या मराठी कलाकारांचे मराठी चित्रपटसृष्टीवर खरोखरच प्रेम आहे? चांगले चांगले कलावंत मराठी चित्रपटसृष्टीकडे पाठ करून हिंदीकडे केवळ जास्त पैसे मिळतात म्हणून वळतात आणि वर चित्रपट आहेत पण थिएटर नाहीत ही अत्यंत वरवरची सबब देतात. ज्यावेळी चित्रपटगृह मालकांनी मराठीसाठी वर्षातून पंधरा दिवस चित्रपटगृहे देण्याचे मान्य केले तेव्हा निर्मात्यांनी भाडे परवडणार नाही असे म्हटले. अखेर मालकांनी वीज, डोअर किपर्स, सफाई कामगार इत्यादींचा फक्त खर्च द्या, असे सांगितले. तरीही चित्रपट निर्माते पुढे आले नाहीत. कारण विचारताच, 'चित्रपट पहायला प्रेक्षकच नाहीत, मग थिएटर घेऊन करणार काय?'

म्हणजे पुन्हा एकदा प्रेक्षकच दोषी ठरले. परंतु चांगल्या चित्रपटाला अद्यापही भरपूर प्रेक्षक आहेत हे स्मिता तळवळकरांसारख्या दिग्दर्शकांनी दाखवून दिले. तसेच उत्तम अभिनय, कथा, दिग्दर्शन असलेले चित्रपट जाहिरातीमुळे लोकांची गर्दी जमवू शकतो हे 'बिनधास्त' या चित्रपटाने दाखवून दिले. परंतु मराठी चित्रपटांची योग्य तऱ्हेने जाहिरात ही केलीच जात नाही, त्यामुळे लोकांना मराठी चित्रपट आल्याचे देखील कळत नाही. आमची चित्रपटसृष्टी अजून 'माहेरची साडी' नेसूनच मिरवत असते. आज निरनिराळ्या वाहिन्यांवर अनेक मराठी कलावंत आपल्याला दिसतात. त्यांचा दर्जा पाहिल्यावर नक्कीच खात्री पटते की, उद्या या कलावंतांनी मनावर घेतले तर मराठी चित्रपटसृष्टी एवढ्या उंचीवर नेऊन ठेवतील की, दक्षिणेतील चित्रपट फिके पडतील. परंतु तसे होत नाही. मग असले टुकार, हिंदीची भ्रष्ट नक्कल असलेले चित्रपट आम्ही का पहावेत? मराठी कलाकारांनी दक्षिणात्य कलावंतांचा आदर्श ठेवून काम केले पाहिजे. तेथील सुप्रसिद्ध नट-नट्यांनी हिंदी चित्रपटसृष्टी गाजवली. परतुं स्वत:च्या भाषिक चित्रपटांना कधीच अंतर दिले नाही. म्हणूनच ती चित्रपटसृष्टी आज भरभराटीस आली.

आज मराठी प्रेक्षकांना दर्जेदार मराठी चित्रपटांची गरज आहे. कारण त्यामुळे आपली संस्कृती, मराठी बाणा टिकवून ठेवता येईल. आशयसंपन्न चित्रपट जर निर्माण झाले तर महाराष्ट्राच्या ३१ जिल्ह्यात तामिळनाडू आणि कर्नाटक राज्यांप्रमाणे प्रेक्षकांचा पाठिंबा घेऊन चित्रपटगृहात किमान सहा महिने मराठी चित्रपट प्रदर्शित करता येऊ शकेल. यामुळे शहरीकरणाच्या वेगवान दुनियेत मराठी संस्कृती टिकवून ठेवण्यास मदत मिळेल. मराठी चित्रपटांचा दर्जा सुधरविण्यासाठी स्पर्धा, पारितोषिक, सन्मान यासारख्या उपाययोजनांमुळे दर्जेदार निर्मिती होऊ शकेल. तसेच प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी जाहिरातींचा वापर मोठ्या प्रमाणावर करता येईल. जर चित्रपटगृहांची समस्या असल्यास महाराष्ट्र सरकारच्या मदतीने शहरात, नगरात, खेडोपाडी तंबू थिएटरची व्यवस्था होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक मराठी निर्माता -वितरकांसमोर उभा असलेला चित्रप्रदर्शनाचा प्रश्न सुलभ होऊ शकेल. एकूणच या सर्व उपाययोजनांमुळे प्रेक्षक मराठी चित्रपटांकडे वळतील. मराठी चित्रपट का पाहू नयेत?' असा प्रश्न पडेल..... !

- गीतेश गजानन शिंदे
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ ९५१९

# ताण-तणाव

*सातत्याने वाढणारे ताण-तणाव व त्यांचे व्यवस्थापन हा आजच्या युगातील आव्हानाचा विषय. या संबंधातील वैद्यकीय विचार मांडणारा हा लेख. - संपादक*

चिंता, काळजी, ताण-तणाव हे शब्द जरी उच्चारले तरी कपाळावर आठी चढते. हा ताण-तणाव लहान-थोर, गरीब-श्रीमंत, काळ-वेळ, पाश्चिमात्य-पौर्वात्य देश, विकसित-विकसनशील राष्ट्रे हे काहीही जाणत नाही. पृथ्वी आता लहान झालीय, असं आपण म्हणतो, पण चिंतेने साऱ्या पृथ्वीला वेढून टाकले आहे. ताण-तणावामुळे निर्माण होणारे शारिरिक व मानसिक विकार म्हणजे जागतिक आरोग्याचा एक मोठा गंभीर प्रश्न होऊन बसला आहे.

**ताण-तणावाची कारणे काय आहेत?**

१) **वैयक्तिक व कौटुंबिक** -स्वत:ला वा कुटुंबातील एखाद्याला बरे नसेल, म्हणजे ताप, आजार, दुखणे असेल तर सर्वांनाच काळजी वाटून राहते. कुटुंबातील आवडत्या व्यक्तीचा अपघात झाला असेल अचानक मृत्यू झाला असेल तर मनावर व शरीरावर प्रचंड ताण पडतो.

एखादी स्त्री, पतीच्या बरोबरीने बाहेर नोकरी-धंदा करीत असेल, आणि घरात लहान मूल असेल, तर त्याच्या संगोपनासाठी, बाळाला कुणाकडे म्हणजे जबाबदार व्यक्तीकडे सोपवून, कामास गेल्यावरही तिला दिवसभर बाळाची काळजी वाटतच राहते.

ती स्त्री गृहिणी असेल तर पती घरी परतेपर्यंत घरची व पतीची काळजी करण्यात तिचा दिवस सरतो. घरात वृद्ध माता-पिता असतील तर त्यांच्याही स्वास्थ्याची काळजी घ्यावी लागते.

अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी मनुष्य अर्थार्जन करू लागला. परंतु त्याच्या ऐहिक सुखाच्या कल्पना इतक्या बदलत व वाढत गेल्या की त्या मिळविण्यासाठी मनुष्य पैशाच्या मागे धावू लागला. वेळ आली तर प्रचंड कर्ज पण घेऊ लागला. पैसा-कर्ज-परतफेड त्यांतून सुटता सुटता, घरात ऐशोआरामाच्या, चैनीच्या गोष्टीही आल्या, कुटुंब सुखावले पण प्रत्यक्ष त्या व्यक्तीला ऐहिक सुखे उपभोगायलाही वेळ मिळेनासा झाला. स्वत:कडे- कुटुंबाकडे, त्याला फुरसत मिळेनाशी झाली कुटुंबात ताण-तणाव निर्माण होऊ लागले. मधल्यामधे व्यक्तीची पंचाईत होवू लागली. शारिरिक व मानसिक आरोग्य (स्वत:चे व कुटुंबाचे) बिघडू लागले. रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार असे आजार अकालीच उद्भवू लागले, भरपेट अन्नही तो आता खाऊ शकत नाही.

काही वेळेस पैसा खूप आहे, त्याचे आता करु काय? त्याचा विनियोग कसा करु? तो कुठे लपवू? ह्याचीच चिंता लागून राहते. आणि शांत झोपही लागत नाही. म्हणजे सगळ्या सुखसोयी आहेत, पण चैनीची झोप नाही तर काय उपयोग? मग झोप लागण्यासाठी झोपेच्या गोळ्या घेतल्या जातात आणि त्याची सवय होऊन बसते.

स्वत:चे मूल मोठे झाल्यावर त्याला योग्य शाळेत प्रवेश मिळेल का? त्यासाठी लाबाबदाच्या लांबच लांब रांगा, प्रवेश परीक्षा - त्यात पास झाल्यावर दररोज मूल शाळेतून घरी परतेपर्यंत लागलेली चिंता, मुलांची शाळेत चालणारी जीवघेणी स्पर्धा, त्यात उत्तम यश मिळविण्यासाठी धडपड, कॉलेज प्रवेशाची समस्या, योग्य शिक्षण घेतल्यावर अर्थार्जनासाठी प्रयत्न, शिवाय मुलांच्या आरोग्याची काळजी, ह्या सर्वांनी जीव अत्यंत मेटाकुटीस येऊन नकळत

वाढणारे पालकांचे ताण.

तारुण्यात प्रवेश करणाऱ्या मुलांच्या समस्या, त्यांची लग्ने, पुढे नीट घडी व्यवस्थित जमावी म्हणून आई-बाबांची होणारी मनाची उलथापालथ, ह्या सर्वांचा ताण वाढत जावून नकळत विकार होऊ लागतात.

भाऊबंदकीमुळे होणारे ताण-तणाव, नात्यांत असणाऱ्या वैमनस्यामुळेही वाढणारे ताण आणि त्यापासून होणारे मानसिक, शारिरिक आजार ह्यांची उदाहरणे आपण कितीतरी पहात असतो.

मुलीचे लग्न योग्य वेळी होत नसेल तर आई-बाबांना लागणारी चिंता अतिशयच असते आणि समाजात -नातेवाईकांत वावरत असताना मुलीला वाटणारी लाज, मानहानी त्याने तीही कोमेजून जाऊन तिच्यावर काही मानसिक आघात होतो की काय ही भीती पालकांना वाटते.

गरीबांचे तर, सध्याच्या धावत्या युगात होणारे सर्वतऱ्हेचे हाल आपण पहातच असतो. गरिबाला पैशाची काळजी असते, दोन वेळचे कुटुंबाला जेवण, अंगावर घालायला कपडा, रहायला घर आणि मुलांनी थोडेफार लिहायला-वाचायला शिकावे हीच कुटुंब प्रमुखाची इच्छा असते आणि त्यासाठी कोणतेही काबाड-कष्ट करण्याची आई-बाबांची तयारी असते.

मध्यमवर्गीय खाऊन-पिऊन सुखी असतात. पण अडी-अडचणीला, भविष्यासाठी थोडा पैसा गाठीशी रहावा यासाठी धडपड सुरू होते आणि त्याची चिंता राहते.

सध्याच्या तरुण वर्गाला तर पैसा अमाप, लवकरात लवकर हवा. धंदा अत्याधुनिक तंत्राने उभा करण्यासाठी वारेमाप कर्ज घेतात, त्या हप्त्यांची परतफेड करण्यासाठी खूप धडपडतात. मित्रांच्या संगतीत पार्ट्या, दारू, बिडी-सिगरेट ह्यांची व्यसने लागून शरीराचे आरोग्य बिघडते.

गरीब जनतेत पैसा नाही म्हणून होणारा मनावरचा ताण सहन न झाल्याने दारुची नशा लागते. व्यसनावर पैसा खर्च होतो. त्याकरिता घरी पत्नीवर, मुलाबाळांवर शिवीगाळ, मारहाण केली जाते याने कुटुंबातील तणाव वाढीस लागून मुलांवर नकळत मानसिक परिणाम होतात.

२) **नैसर्गिक** - एखाद्या भागात नैसर्गिक कोप होतो. म्हणजे भूकंप, महापूर, कोरडा दुष्काळ ह्याने वित्तहानी तर होतेच् पण जीवित हानीही अमाप होते आणि नकळत संबंध देशावर दुःखाची छाया पसरून आपत्ती पेलवू न शकणाऱ्यांना अचानक मानसिक आघात होतो. ११ सप्टेंबरला अमेरिकेत दोन प्रचंड इमारतींवर झालेल्या हल्ल्याने साऱ्या जगालाच धक्का बसला, यामुळे अनेक शारिरिक-मानसिक आजारांनी अजूनही काही लोक जगत असतील.

३) **राजकीय** - देशात राजकीय खळबळ माजली, अचानक नेता गेला, प्रचंड राजकीय उलथापालथ झाली, सत्ताधारी व विरुद्ध पक्षाचे लोक आपापसात भांडताना पाहिल्यावर जनमानसात भीतीचे वातावरण तयार होते. टी.व्ही.सारखी दृक् माध्यमे लहानापासून थोरांपर्यंत पहात असतात. यातील कार्यक्रम निखळ, करमणुकीचे व माहितीपूर्ण, उद्‌बोधक हवेत. चार घटका संसारातून, कटकटीतून बाजूला राहून फक्त आनंद खरा उपभोगायला मिळायला हवा. परंतु अलिकडे बऱ्याच हिंदी सिरियलस् ज्या सारा देश पाहतो, त्या कैटुंबिक वातावरणांतील तणावानेच भरलेल्या असतात. यामुळे सर्वांवर विपरित परिणाम होवू शकतो.

४) **जाती-धर्म** - जाती-धर्म म्हणून भांडणे विकोपास जावून अनर्थ घडत असलेला आपण पाहतो, ह्याचा परिणाम सर्व सामान्य जनतेवर होऊन एक भीतीचे सावट पसरते.

५) अलिकडे बुद्धिवादी व कामगार शिक्षणानिमित्त आणि उद्योगधंद्यानिमित्त अधिकाधिकपणे परदेशांत जात असतात, त्यांच्यावर मातृ-भूमीचा जबरदस्त पगडा असतो. स्वतःच्या पूर्ण हिमतीवर सारा संसार थाटायचा असतो. हा नकळत त्यांच्यावर दबाव येतो. शिवाय इकडे माता-पिताही, मुलांची नुसती काळजी व आठवणी काढीत जीवन कंठीत असतात. ठराविक वयाला मुलांची गरज असते त्यावेळी ती जवळ नसतात, त्यांच्यावर ताण वाढत जाऊन रक्तदाब, हृदयाचे विकार वाढत चालल्याची उदाहरणे आहेत. तर तिकडे परदेशांत आपल्या मुलांना सर्वार्थाने प्रचंड ताण-तणाव वाढून लहान वयातच हृदयाचे विकार होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

६) सध्याचे चटपटीत आवडत्या खाण्याचे प्रकार वरचेवर तरुण वर्ग खात असतो, रक्तांतील विशिष्ट घटक वाढतो, लठ्ठपणा, रक्तदाब, अकाली हृदयविकार होतात.

**व्यक्ती तणावाखाली वावरत असताना काय होते?**

शरीर आणि मन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, तणाव झालेल्या व्यक्तीचे शारिरिक व मानसिक संतुलन बिघडते. सकाळी उठल्यावर प्रसन्न न वाटता डोके जड होऊन दुखू लागते. उत्साह नाही, चिडचिडेपणा अधिक येतो. कामात लक्ष लागत नाही. मुलांची वाढ बरोबर होत नाही, म्हणजे फुफ्फुस, मेंदू, यकृत हे बरोबर काम करेनाशी होतात. कशातही मन रमत नाही. प्रतिकार शक्ती कमी होते.

कधीकधी हा आघात इतका प्रचंड होतो की मनुष्याचा रक्तदाब अचानक कमीही होतो व तो शॉकमध्ये जावून बेशुद्धही होवू शकतो. तणाव सहन न होऊन मृत्यूही येवू शकतो.

**ताण-तणाव झाल्यावर शरीरात काय काय प्रतिक्रिया चालू होतात?**

कोणताही व्याधी-आजार झाला वा आघात झाला तर शरीर त्यास खंबीरपणे उत्तर देण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असते. तणाव निर्माण झाल्यावर त्या संज्ञा मेंदूकडे येतात. मेंदूकडून व मेंदूमध्ये असणारी अँटिरियर प्युटिटरी अँड्रिनोकॉर्टिको ट्रॉफिक नावाचा हॉर्मोन स्रवून त्याच्या संज्ञा मूत्रपिंडावरील असणाऱ्या अँड्रिनल ग्रंथीच्या अँड्रिनल कॉर्टेक्सला उद्युक्त करतात. ही ग्रंथी अँड्रिनल कॉर्टिकोसॉल स्रवते व त्यामुळे रक्तदाब थोडा थोडा वाढू लागतो व तणाव हळूहळू कमी होतो. परंतु हा तणाव सततचा होऊन बसला, वाढतच राहिला तर कॉर्टिकोसॉलचे दुष्परिणाम दिसू लागतात. रक्तदाब अधिकाधिक वाढतो, हृदयाचे विकार उद्‌भवू लागतात. अँड्रिनोकॉर्टिको ट्रॉफिक हॉर्मोनबरोबर मेंदूतील पिट्यूटरी (अँटिरियर) इतरही ग्रंथींना उद्युक्त करतात. उदा. हिस्टामिन ह्याचे १ व २ हे प्रकार आहे. हिस्टामिन १ मुळे श्वासनलिका आकुंचित पावून श्वास घेण्यास त्रास होतो. हिस्टामिन २ मुळे जठरात आम्ल अधिक तयार होवून जठरात व्रण होतो व त्याचे परिणाम म्हणजे पोटदुखी होते. अँटि डाययुरेटिक हॉर्मोन स्रवल्यामुळे लघवीचे प्रमाण कमी होते. अशा इतर तक्रारीही ताण अधिकाधिक वाढत चालला तर दिसून येतात. कधीकधी कॉर्टिकोसॉलमुळे हाडातील कॅल्शियम काढून घेतले जाते. हाडे ठिसूळ बनतात. संधिवातही होतो.

तणावामुळे कातडीचे रोग झाल्याचे दिसून येतात. स्नायूंवरही याचा परिणाम होवून - स्नायूंची कमजोरी होते. स्नायू दुखू लागतात. मानसिक विकार बळावतात, व्यक्तीचे व्यक्तिमत्त्वच बदलून जाते. काही व्यक्ती विचित्रच नको तिथं गडबड करताना दिसतात. उगीचच जोरात भराभर बोलतात, चटकन विषय बदलतात.

तर काही व्यक्तींना कसलीही तमा नसते. कसलीही गडबड घाई रहात नाही. कशातही काहीही रस उरत नाही. कुणाशी बोलेनाशा होतात. 'डिप्रेशन'मध्ये जावून कधी

कधी असाध्य वाटणारा स्क्रिझोफ्रेनिया ही होवू शकतो. अशा रीतीने मनावर प्रचंड आघात होवून मनोविकार होतो.

**या सर्वांवर उपाय आहे काय? तणावविरहित कसे राहता येईल?**

१) ताण-तणाव कशामुळे झाला आहे याचे मूळ कारण शोधून तो कमी करण्याचा, त्यावर उपाय केला पाहिजे.

२) ताण-तणाव झाल्यावर तो कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा नाहीतर त्यांचे दुष्परिणाम वाढत जातील. हे आपण पाहिलेच आहे.

**ताण-तणाव विरहित आयुष्य जगता येते काय?**

हो येते.

३) सकाळी/पहाटे उठल्यावर बिछान्यात ताठ बसावे व दीर्घ श्वास घ्यावा. दिवसभर आपण काय कामे करणार आहोत ह्याचा विचार करावा.

४) दीर्घ श्वसनाने ताण कमी होतो. मन प्रसन्न होते.

५) शवासन हा योगाचा उत्तम प्रकार आहे. यात शरीर/मन पूर्णपणे शांत/विचारविरहित सैलसर सोडून द्यायचे. शास्त्र शुद्ध तज्ज्ञांकडून शिकून घ्यावे. १/२ तास जरी केले तरी ८ तास झोप काढल्यासारखे वाटते. मन प्रसन्न राहते. शारीरिक थकवा दूर होतो. काम करण्यास उत्साह वाटतो. ताण कमी होतो.

६) हास्य क्लब : हल्ली मुंबई सारख्या शहरात लोक एकत्र येवून मुद्दाम हसतात. ह्याने शारिरिक/मानसिक दुःख



विसरायला होऊन तणाव दूर होतो.

७) दैनंदिन जीवन जगण्याची, व्यसनविरहित राहण्याची, आनंदाने राहण्याचे अवलंबिले तर ताण-तणाव कमी होतात.

८) कधीही राग आला, चिडायला झाले, दुःख झाले तर मनातल्या मनात १ ते १० अंक मोजावेत व दीर्घ श्वसन करावे. ताण बराच हलका होतो.

९) नको रे मना क्रोध हा खेदकारी ।

नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे ।

अति स्वार्थबुद्धी ने रे पाप सांचे ।

देहे दुःख ते सूख मानीत जावे ।

नको रे मा लोभ हा अंगिकारु ।

समर्थ रामदास अशा सहज सोप्या श्लोकांत बरच सांगून जातात. आणि शिवाय

जनी सर्व सुखी असा कोण आहे ?

विचारे मना तूचि शोधूनि पाहे ।

मना मानसी दुःख आणू नको रे ।

मना सर्वथा चिंता नको रे ।

अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।

अती विषयी सर्वदा दैन्यवाणा ।

यांतूनही स्वामी समर्थ रामदास सर्व सांगतात. जणू ते मानसतज्ञच होते म्हणा ना !

म्हणून मनाच्या श्लोकांचेही वरचेवर अर्थ समजून पठण करावे !

१०) चांगले पहावे, चांगले ऐकावे, चांगलेच

वाचावे.

११) अन्न चौरस, ताजे सेवन करावे. आहार हलकाच असावा. ताज्या भाज्या-फळे यांचा वरचेवर वापर करावा.

१२) रोजचा दिनक्रम नियमित असावा. रात्रीचे जेवण तरी मिळून-आनंदी वातावरणात व्हावे, म्हणजे ताण बराच हलका होतो. वातावरण प्रसन्न राहते.

१३) शाळेत शिकवीत असलेले सर्वांग सुंदर व्यायाम करावेत. ह्याने सर्व सांध्यांना, स्नायूना व्यायाम मिळतो. रक्ताभिसरण चांगले होते. रोज जमेल तेव्हा मोकळ्या हवेत फिरायलाही जावे याने मन हलके होते, ताजे-तवाने राहते.

१४) दररोज वेळ मिळेल तेव्हा ॐ कार नाद करावा, याने श्वसनमार्गास शक्ती येते, प्रतिकार शक्ती वाढते, ताण-तणाव दूर होतात.

१५) घरात कायमच प्रसन्न, आनंदी वातावरण ठेवावे. स्वतःची दुःखे स्वतःपुरतीच ठेवून मुलांपर्यंत पोहोचू देऊ नयेत.

१६) अधिकाधिक कर्ज घेवून ते परत फेडीचा ताण घेण्यापेक्षा स्वतःची जेवढी हिंमत असेल, ताकद असेल त्याप्रमाणेच करावे.

१७) एखादा छंद लहानपणापासून जोपावा, म्हणजे फावल्या वेळांत तो वापरता येतो. शास्त्रीय संगीत ऐकणे, गाणे, चित्रकला, नृत्य, फुले-झाडे ह्यांचे जतन करणे त्यांना जलसिंचन करणे याने बराचसा तणाव कमी होतो.

१८) लहान मुले निरागस, आनंदी हसरी असतात. त्यांच्या संगतीत राहिल्याने आपणही लहान होऊन जातो व सारे दुःख विसरून जातो.

१९) शारीरिक व मानसिक ताण कमी करण्यासाठी तज्ञांच्या सहाय्याने औषधोपचार करावेत.

२०) आयुर्वेदातही ब्राह्मी, अश्वगंधा ह्यासारख्या वनौषधी आहेत ज्याने....

१) शारीरिक व मानसिक संतूलन राहते.

२) मनाची मरगळ दूर होऊन उत्साहितपणा व तरतरीतपणा येतो.

३) तणाव दूर राहून शांत झोप लागते.

४) रक्तदाब, मधुमेह, श्वसनाचे विकार, पोटाचे विकार आटोक्यात आणण्यास मदत होते.

५) तारूण्य कायम ठेवून, शरीर उल्हसित, निरोगी ठेवते.

अशा रीतीने सांगितलेले सर्व उपाय तणावयुक्त आयुष्य जगण्यास उपयोगी पडतात.

**डॉ. सौ. प्रभा जयंत कर्वे**
'शांता निवास', कोपरी रोड,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
फोन नं. : २५४० ६०६३

**लेख / वर्गणी / जाहिराती पाठविण्यासाठी पत्ता**

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

# वाहन विवेक - एक वेगळे पुस्तक

*विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथप्रेमी व साक्षेपी वाचक प्रा. विनायक बुरकुले यांनी 'वाहन विवेक' या वेगळ्या पुस्तकाचा परिचय येथे करून दिला आहे. - संपादक*

एका पुस्तक प्रदर्शनात, पुस्तके चाळताना 'वाहन विवेक' (लेखक - रमेश पुंडे) हे पुस्तक दिसले. पुस्तकाची अर्पणपत्रिका वाचली.

*'वाहन चालविताना*

*स्वत:च्या किंवा दुसऱ्याच्या*

*अज्ञानामुळे झालेल्या अपघातात*

*ज्यांनी आपले प्राण गमावले*


*अशा असंख्यांना'*

लगेचच पुस्तक खरेदी करून घर गाठले आणि पूर्ण वाचले. दुसऱ्या दिवशी दिशाच्या वाचकांना या पुस्तकाचा परिचय मी करून द्यावा, अशी प्रा. मोहन पाठक यांनी विनंती केली. प्रत्येक भेटीत न कंटाळता मोहन पाठक मला आठवण करीत राहिल्याने अखेर 'दिशा'च्या वाचकांसाठी हा परिचय.

सध्याच्या गतिमान जीवनात स्वत:कडे एकही वाहन नसलेले कुटुंब सापडणे कठीण. वाहनांचे विविध प्रकार, वाहनांच्या तांत्रिक बाबींमधील वाहनमालक व वाहनचालकांचे असलेले संपूर्ण अज्ञान व अनास्था तसेच बेफिकीरपणे वाहन चालवण्याची वृत्ती यामुळे वाहतुक समस्येने अत्यंत गंभीर स्वरूप घेतले आहे. अशा व इतर अनेक कारणांमुळे वाहनांबाबत आणि वाहतुकीविषयी नीतिनियमांची समग्र माहिती देणारे एखादे मराठी पुस्तक आहे का याचा श्री. रमेश पुंडे यांनी शोध घेतला, पण असे पुस्तक त्यांना आढळले नाही. म्हणून त्यांनी स्वत:च पुस्तक लिहिले.

या पुस्तकातील माहिती प्रादेशिक परिवहन खाते, वाहतूक पोलीस शाखा, विमा कंपनी, ए.आर व ए.आय.इ. कार्यालयातील अधिकाऱ्यांशी चर्चा व विचारविनिमय करून माहिती तपासून घेऊन स्वत:च्या वाहनाविषयीच्या ज्ञानाचे संकलन करून अत्यंत परिश्रमपूर्वक अत्यंत मनोवेधक स्वरुपात मांडले आहे.

तसेच डॉ. पसरिचा यांचे 'ड्रायव्हर्स मॅन्युअल' याचे वाचन ही लेखकाला खूपच उपयोगी पडल्याचे लेखकाने नमूद केले आहे. एकंदर सोळा प्रकरणात माहितीचे संकलन करून माहिती विभागण्यात आली आहे.



१) नवीन मोटरकार विकत घेणे.

२) वापरलेली मोटरकार विकत घेणे.

३) वाहन नोंदणी व कर आकारणी

४) वाहन चालविण्याचा परवाना

५) वाहन विमा संरक्षण

६) वाहनाची साधने / उपकरणे

७) वाहनांची देखभाल व इंधन बचत

८) वाहन हाताळणे - शिष्टाचार, पद्धत व सूचना

९) वाहन चालविण्याची कला व कसब

१०) वाहनातील आणिबाणी व दोष

११) वाहनाचे अपघात व गुन्हे

१२) स्वयंचलित दुचाकी वाहन खरेदी

१३) पथनिर्देशक खुणा व वाहतूक संकेत (सिग्नल्स)

१४) सार्वजनिक वाहने

१५) रस्ते वाहतूक नियम - १९८९

१६) वाहनाच्या नोंदणी क्रमांकाची पद्धत






वाहन वाळगणाऱ्याने वाहनांची देखभाल कशी करावयाची या संबंधीची माहितीही पुस्तकात आहे. त्यातील काही मुद्दे -

* वाहनाची देखभाल ही वाहन मालकाची जबाबदारी असते.
* प्रत्येक स्वयंचलित वाहनांबरोबर ओनर्स मॅन्युअल व सर्विस मॅन्युअल अशा दोन वेगवेगळ्या पुस्तिका किंवा एकत्रित केलेली एकच पुस्तिका मिळते.
* कित्येक वाहन चालक ही पुस्तिका उघडून देखील बघत नाहीत.
* ही पुस्तिका वाचून आत्मसात केली तर वाहन पूर्णपणे समजण्यास सहज सोपे जाते.
* वाहन चालकाने या पुस्तिकेनुसार वाहनाची देखभाल केली तर वाहन मालकास धोका देत नाही.

वाहनासंबंधी घ्यावयाच्या काळजीचे वेळापत्रकही या पुस्तकाची उपयुक्तता वाढविणारी माहिती. प्रत्येक कालावधीसाठी साधारणपणे खालील कामे असतात.

**दैनंदिन कामे** -वाहन आतून व बाहेरून स्वच्छ पुसणे. वाहन चालवले जाणार नसल्यास ते सुरू करून थोडे रेझ करून बॅटरी चार्ज करून ठेवणे. वाहनांचे माईलेज लॉग बुकात नोंद करणे.

**साप्ताहिक कामे** -इंजिन ऑईल, कूलंट, पाणी वायपर्स साठी असलेल्या टाकीत पाणी भरणे. सर्व चाकांमधील हवा चेक करणे. ब्रेक फ्ल्युईड तपासून घेणे.

(पान क्र. ३६वर)

# परिसर वार्ता

महाविद्यालयाचा परिसर हा मजकूर लिहिताना गजबजून गेला आहे. एकूणच ठाण्यातील वातावरण मेरीटमय झाल्याने परिसरात भविष्याची स्वप्ने घेऊन अकरावीच्या अॅडमिशनलिस्टकडे डोळे लावून शोधणारे विद्यार्थी, त्यांचे पालक, मित्र-मैत्रिणी या सर्वांमुळे वातावरण 'उद्याच्या आशा' पल्लवीत करणारे झाले आहे. ज्ञानमार्गावर आणि परिसरात सर्वत्र पावसाच्या वरदहस्तामुळे हिरवं जग बहरतंय ! या पार्श्वभूमीवर या वेळचं परिसर वार्ता.

### बांदोडकर्स आर टॉपर्स

बांदोडकरच्या माजी विद्यार्थी व अनुबंध माजी विद्यार्थी संघाचा पदाधिकारी प्रशांत पैने दिलेली बातमी आनंद वार्ता होती. २००१-०२ला महाविद्यालयातून प्राणिशास्त्र विषय घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांतील रजनी सागर हिने एम्.एस्सी. ७६% गुण मिळवले व विद्यापीठात आणि रुईयात ती प्रथम आली. अवधेश शर्मा ६८% गुण मिळवून सोमैयातून प्रथम तर शालिनी शहा ६६% गुण मिळवून बिर्लातून प्रथम आली. स्वत: प्रशांतने रुपारेलची लिस्ट टॉप केली व ६४% मिळवून तो रुपारेल मधून पहिला आला. या विद्यार्थ्यांनी आपल्या कॉलेजातील प्राणिशास्त्र विभागातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी बी.एस.सी.पर्यंत आम्हाला घडवण्याचे जे कष्ट घेतले त्या कष्टांना या यशाचे श्रेय दिले आहे.

या सर्वांचे त्यांच्या (माहेरच्या) महाविद्यालयाकडून विशेष अभिनंदन !

### नागरी तलावाचे संवर्धन व व्यवस्थापन

या विषयावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी बांदोडकर विज्ञान महाविद्यालय पदवी विभागाच्या उपप्राचार्या व प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सौ. माधुरी पेजावर यांना निमंत्रित करण्यात आले होते. १६ ते १८ जून २००३ या दरम्यान सदर कार्यशाळा हैद्राबाद येथील ज्युबिली हॉल येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत नागरी तलावांच्या संवर्धनासंबंधाने विविध विषयोपविषयांवर चर्चा व निबंध वाचनाची ८ सत्रे तीन दिवसात झाली. प्रा. डॉ. सौ. पेजावर यांनी ठाण्याच्या जवळ जवळ १० तलावासंबंधातील माहिती यावेळी सादर केली.

### बेडेकर विद्यामंदिर

डॉ. बेडेकर विद्यामंदिराच्या माध्यमिक विभागाचा शालांत परीक्षा मार्च २००३ चा निकाल ९५.९७% लागला असून, शाळेतील पहिले दहा विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत.

| गुणानुक्रम | विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १) | पूजा विकास गोरे | ६८८/७५० | ९१.७३% |
| २) | स्वप्ना सुहास गोरे | ६८१/७५० | ९०.८०% |
| ३) | सिद्धेश शिरीश सिनकर | ६८०/७५० | ९०.६६% |
| ४) | सागर अरुण शिंदे | ६७३/७५० | ८९.७३% |
| ४) | अजिंक्य रमेश नेने | ६७३/७५० | ८९.७३% |
| ४) | मदुरा प्रकाश नाईक | ६७३/७५० | ८९.७३% |
| ५) | अनुजा प्रकाश नामजोशी | ६६८/७५० | ८९.०६% |
| ६) | ओंकार दीपक लिमये | ६६५/७५० | ८८.६६% |
| ७) | दिगंबर प्रकाश जाधव | ६६३/७५० | ८८.२६% |
| ८) | मीनल नरेंद्र पाटील | ६६०/७५० | ८८.००% |
| ९) | नीलेश नाथ गोवेकर | ६५९/७५० | ८७.८६% |
| १०) | भूपेश प्रभाकर फिरके | ६५५/७५० | ८७.३३% |

मार्च २००३

एस.एस.सी. परीक्षा विषयातील सर्वप्रथम

| | विषय | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|---|
| १) | मराठी | नाईक मदुरा प्रकाश | ८४/१०० |
| २) | हिंदी | पाटील मीनल नरेंद्र | ८५/१०० |
| ३) | संस्कृत | लिमये ओंकार दीपक | ९७/१०० |
| | | शिंदे सागर अरुण | ९७/१०० |
| ४) | इंग्रजी | गोरे स्वप्ना सुहास | ९१/१०० |
| ५) | गणित | गोरे पूजा विकास | १४४/१५० |
| | | जाधव दिगंबर प्रकाश | १४४/१५० |
| ६) | विज्ञान | पाटील मीनल नरेंद्र | १४७/१५० |
| ७) | समाजशास्त्र | देवरे अविनाश नारायण | १४४/१५० |
| | | गोरे पूजा विकास | १४४/१५० |

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका केळकरबाईंनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत शाळेतील इ. १०अ मधील दुर्गेश अनिल देशपांडे हा राज्यात १२व्या क्रमाने यशस्वी झाला आहे. सर्वांतर्फे मन:पूर्वक अभिनंदन ! याच परीक्षेत कु. सायली संजीव श्रोत्री (९अ) ही राज्यात गुणवत्ता यादीत २१व्या क्रमांकावर चमकली.

दोन्ही विद्यार्थी महाराष्ट्र प्रज्ञा शोध शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले आहेत.

**सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा**

शाळेतील निकालाचा तपशील पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| परीक्षेस बसलेले विद्यार्थी | १५६ |
| उत्तीर्ण | १५५ |
| टक्केवारी | ९९.३५% |

| | |
|---|---|
| ९०% पेक्षा अधिक | १६ |
| ८५-८९% | २३ |
| ७५-८४% | ५६ |
| ६०-७४% | ४७ |
| ४५-५९% | १३ |
| एकूण | १५५ |

**बोर्डात आणि शाळेत**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्वप्नील घोडगे | ९२.८०% | १४वा |
| २) | श्रुती दिवे | ९२.२६% | १८वी |
| ३) | राही सरनोबत | ९२.२६%% | १८वी |

**पहिले दहा**

| | | |
|---|---|---|
| १) | स्वप्नील घोडगे | ९२.८०% |
| २) | श्रुती दिवे | ९२.२६% |
| ३) | राही सरनोबत | ९२.२६% |
| ४) | मृणाल सरवटे | ९२.००% |
| ५) | प्राजंली वागळे | ९१.७३% |
| ६) | ऋतुजा मोरे | ९१.६०% |
| ७) | हेनल देढिया | ९०.९३% |
| ८) | शल्मली कुलकर्णी | ९०.८०% |
| ९) | मयुरी दाते | ९०.८०% |
| १०) | समीर पार्वती | ९०.४०% |

विषयवार 'सर्व प्रथम'

| | | |
|---|---|---|
| इंग्रजी | हेनल देढिया | ८२/१०० |
| | श्रुती दिघे | ८२/१०० |
| संस्कृत | राही सरनौबत | ९७/१०० |
| हिंदी | जयेश पटेल | ८९/१०० |
| मराठी | राही सरनौबत | ९०/१०० |
| गणित | कपिल टेमघरे | १४८/१५० |
| सायन्स | जयेश पटेल | १४७/१५० |
| | बागळे प्रांजली | १४७/१५० |
| सोशल सायन्स | स्वप्नील धोंडगे | १४७/१५० |
| | सागर जाधव | १४७/१५० |

सर्व विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका सौ. कोल्हटकरबाई यांनी अभिनंदन केले आहे.

**संकलित**

## जुलै मधील विशेष दिवस

१० देवशयनी (आषाढी) एकादशी
११ विश्वलोकसंख्या दिन
१३ गुरूपौर्णिमा
१४ गोपाळ गणेश आगरकर जयंती
१८ लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुण्यतिथी
२३ लो. टिळक जयंती
२६ राजर्षी शाहू महाराज जयंती
२७ संत नामदेव महाराज पुण्यतिथि
२८ दीप पूजन, संत सावता महाराज पुण्यतिथी
३१ नाना शंकर शेठ पुण्यतिथि, महमंद रफी पुण्यतिथी

(पान क्र. ३३ वरून)

**वाहन विवेक - एक वेगळे पुस्तक**

**मासिक कामे** -वाहनाचे सर्विसिंग करून घेणे. वाहनांतील फिरणाऱ्या भागांच्या सांध्यांना वंगण लावणे. वाहनांची बॅटरी तपासून घ्यावी.

**त्रैमासिक कामे** -फॅनबेल्ट तपासून घ्यावा. Wheel करून घ्यावे. ट्रान्समिशन फ्ल्युईड तपासून घ्यावे.

**षण्मासिक कामे** -पी. यु. सी. चा दाखला नूतनीकृत करून घ्यावा. इंजिनाचे ट्युनिंग करून घ्यावे. कार्ब्युरेटर सेटिंग करून घ्यावे. आईल फिल्टर बदलून घ्यावा. टायर्स तपासून घ्यावेत.

**वार्षिक कामे** - वाहनाच्या चाकातील बेअरिंग्ज व सस्पेंशन तपासून घ्यावे. ब्रेक सिस्टीम तपासून घ्यावे. ब्रेक फ्ल्युईड बदलावे. स्वराचे सर्व भाग तपासून घ्यावेत. व्हील असेंब्ली तपासून घ्यावी. वाहनास गंजविरोधी प्रक्रिया करून घ्यावी.

वाहनात आवश्यकतेपेक्षा जास्त इलेक्ट्रिकल उपकरणे लावू नयेत. अन्यथा बॅटरीवर विनाकारण ताण येतो. या पुस्तकाची उपयुक्तता त्यातील व्यंगचित्रांमुळे वाढली आहे. ही व्यंगचित्रे अतिशय सूचक आहेत. त्यातील ३ व्यंगचित्रे मुद्दाम येथे देत आहे.

श्री. रमेश पुंडे यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून अतिशय कष्टाने सर्व माहिती संकलित करून सर्वसामान्य जनतेसाठी पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. तरी सर्वांनी या पुस्तकाचे वाचन व वापर केल्यास वाहन बाळगणे व चालविण्याचा आनंद नक्कीच मिळेलच.

रोहन प्रकाशनाने प्रसार व जागृतीसाठी विशेष सवलत मूल्य रु. ७५/- मध्ये हे पुस्तक देऊ केले आहे.

❑❑❑